जगद्‌गुरु तुकोबाराय साहित्य परिषदेचे अधिकृत मुखपत्र

# ॥ तुकोबावाणी ॥

नोव्हेंबर २०२० ते जानेवारी २०२१



संपादक

**बालाजी मा. जाधव उजेडकर**

जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषदेचे अधिकृत मुखपत्र

# ॥ तुकोबावाणी ॥

जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषद

**त्रैमासिक**

**नोव्हेंबर २०२० ते जानेवारी २०२१**

जगद्‌गुरू तुकोबाराय साहित्य परिषदेचे अधिकृत मुखपत्र

# ॥ तुकोबावाणी ॥

**आमचे प्रेरणास्थान**

**शिवश्री ॲड. पुरुषोत्तमजी खेडेकर**

संस्थापक अध्यक्ष

मराठा सेवा संघ

**प्रमुख मार्गदर्शक**

शिवश्री डॉ. अशोक राणा (राष्ट्रीय अध्यक्ष)

शिवमती डॉ. निर्मलाताई पाटील (प्रदेशाध्यक्ष)

शिवश्री डॉ. प्रकाश काळे (प्रदेश कार्याध्यक्ष)

**संपादक**

शिवश्री बालाजी जाधव, उजेडकर (प्रदेश महासचिव)

**सहसंपादक**

शिवश्री डॉ. स्वप्नील चौधरी (प्रदेश सहसचिव)

**संपादक मंडळ**

शिवमती डॉ. सुनंदाताई जरांडे

शिवश्री सुरेश राऊत

शिवश्री प्रा. सतीश हानेगावे

शिवश्री इंजि. कुणाल पाटील

**संपर्कासाठी पत्ता**

बालाजी मा. जाधव, उजेडकर

संपादक - तुकोबावाणी

मु.पो. हिसामाबाद (उजेड)

ता. शिरुर अनंतपाळ, जि. लातूर - ४१३ ५४४

संपर्क : ९७६७७०९२१३ / ९४२२४७१४७४

---

**या अंकातील मजकूराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.**

# सं पा द की य ....

जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषदेचे अधिकृत मुखपत्र "तुकोबावाणी" चा अंक प्रकाशित होताना होणारा आनंद स्वाभाविक तितकाच जबाबदारीचे भान देणारा आहे. "तुकोबावाणी" प्रकाशनाची धुरा आत्मीय भावनेनी व विश्वासाने माझ्यावर सोपविल्याबद्दल साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. डॉ. अशोक राणा, प्रदेशाध्यक्षा डॉ. निर्मलाताई पाटील यांना प्रारंभीच धन्यवाद देतो. हा दीर्घकाळच्या खंडीत अवस्थेनंतर वाचकांना उपलब्ध करून देताना तो अधिक दर्जेदार, वाचनीय आणि ज्या विचारांची कास धरून जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषद चळवळीच्या माध्यमातून जे विचार समाजमनावर पेरणी करण्याचा सदोदित विचार करते त्या भूमिकेला न्याय देणारा कसा होईल या दृष्टीने प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे. ज्या काही उणीवा किंवा दोष असतील त्याची जबाबदारी स्विकारताना संकोच वाटत नाही. भविष्यातील अंक अधिकाधिक निर्दोष व आपल्याला भावणारे असतील याची मात्र आत्मविश्वासपूर्वक हमी देतो.

वैज्ञानिक दृष्टिकोन असलेल्या व चिकित्सक समाजनिर्मितीचे स्वप्न बाळगून प्रबोधन विचार देणारी जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषद ही एक आश्वासक चळवळ आहे. बहुजन समाजाला आत्मभान देवून मानवतेचा विचार समाजात

रुजविण्याचा ही परिषद सातत्याने प्रयत्न करीत आलेली असून भविष्यातील वाटचाल देखील याच दिशेने निश्चितपणे असणार आहे. मराठा सेवा संघाच्या माध्यमातून युगपुरुष शिवश्री पुरुषोत्तम खेडेकर साहेबांनी जे स्वप्न पाहिले त्या स्वप्नपूर्तीसाठी विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या कक्षांपैकीच "जगद्‌गुरू तुकोबाराय साहित्य परिषद" हे एक महत्त्वाचे कक्ष समजले जाते. कोणतीही कृती करण्यापूर्वी त्या कृतीसाठीच्या सुसंगत विचारांची मांडणी आवश्यक असते. विचारातून कृती जन्माला येते. चिंतनशील व्यक्ती विचारांची मांडणी करत असतात. ही वैचारिक मांडणी विविध माध्यमातून समाजासमोर येत असते. प्रत्यक्ष संपर्क व संवादाने ही मांडणी समाजासमोर येते परंतु या प्रत्यक्ष संपर्क व संवादाला मर्यादा असतात. साहित्याच्या माध्यमातून केलेली मांडणी ही सहजपणे सर्वदूर पोहचविणे सुलभ असते म्हणूनच साहित्याचे अनन्यसाधारण महत्त्व राहिलेले आहे. ज्यांच्या नावाने साहित्य परिषद कार्यरत आहे, त्या जगद्‌गुरू तुकोबारायांनी काही शतकांपूर्वी अभंगाच्या रूपाने केलेली साहित्यातील मांडणी आजही समाजाला दीपस्तंभासारखा प्रकाश देवून सन्मार्गाची वाट स्विकारायला भाग पाडते. वैश्विक विचार देण्याचे कार्य तुकोबारायांची 'गाथा' करते. याचा चळवळीतील सर्वांना सार्थ अभिमान वाटणे स्वाभाविक आहे. तुकोबारायांच्या गाथेतील अभंगातून ज्ञान, विज्ञान, पर्यावरण, समाजकारण, अर्थकारण अशा सर्व स्तरातील विचारांना स्पर्श झाल्याचे दिसून येते. या अभंगातून हळुवार भावना जशा व्यक्त होताना दिसतात त्याच पद्धतीने दांभिकतेवर आसूड ओढताना तुकोबारायांची लेखणी अडखळत नाही हे विशेष. रंजल्या-गांजल्याप्रतीची कणव त्यांच्या लेखणीतून व्यक्त होतानाच, वृक्षवल्ली आम्ही सोयरे - वनचरे हा पर्यावरणविषयक संदेश देणारा अभंग वाचनात येतो. बहूमताचा विचार न करता सत्याचरणाचा मार्ग तुकोबाराय अभंगातून सहजपणे दाखवून देतात. हाच डोळस विचार समाजात रुजविण्यासाठी साहित्य परिषद कटिबद्ध असून तो विचार जनसामान्यापर्यंत पोहचविण्याचे कार्य 'तुकोबावाणी'च्या माध्यमातून करणे अभिप्रेत आहे.

समाजहित साधण्याचा विचार देतं ते खरं साहित्य. समाजातील व्यथा, वेदना, कटू वास्तव साहित्याच्या मांडणीतून निर्भिडपणे समोर यायला हवे. कोणत्याही साहित्य प्रकाराच्या माध्यमातून हा समाजमनाचा हुंकार प्रकट व्हायला हवा. हा हुंकार समाजासमोर आणण्यासाठी 'तुकोबावाणी' सिद्ध आहे. सामाजिक समस्यांना वाचा फोडतानाच त्यासाठीचे समर्थ पर्याय देखील आपल्या साहित्यातून प्रकट व्हावेत ही अपेक्षा गैर ठरू नये. कल्पना विश्वात रममाण करणाऱ्या साहित्यापेक्षा समाजउभारणीसाठी पूरक साहित्य निर्माण होणे

ही आजची गरज वाटते. मानवतावादी दृष्टीकोन देणाऱ्या साहित्याचे स्वागत करताना आनंदच वाटेल.

'कोरोना'सारख्या आपत्कालीन परिस्थितीतून आपण सर्वजण जात असताना एक प्रकारचे नैराश्य, उदासिनता येणे स्वाभाविक आहे. या आपत्तीने खरे तर मानवसमूहाला वेगाने धावताना भानावर आणण्याचे कार्य केलेले आहे असेच म्हणावे लागेल. भौतिक सुख-साधनांच्या हव्यासापोटी माणूस यंत्रवत धावत होता. एक प्रकारचे कोडगेपण घेवून जीवघेण्या स्पर्धेत उतरला होता. आपण दैनंदिन जीवनात का धावतोय याचे देखील भान उरले नव्हते. परस्पर संवादासाठी वेळ नव्हता. "पळा पळा कोण पुढे पळे तो" अशी काहीशी विचित्र अवस्था आपण अनुभवत होतो. अवती भवतीच्या घटनांकडे पाहण्यासाठी कोणाकडे वेळही नव्हता. निर्ढावलेपण घेवून जगणं सुरू असताना 'कोरोना'च्या निमित्ताने सर्व काही ठप्प झालेलं आपण अनुभवलं. कित्येक वर्षात गावाच्या मातीची ओढ नसलेली पावलं गावाकडं वळली. नातेवाईकात दीर्घ काळाच्या विश्रांतीनंतर सुसंवादाचे सूर कानी पडू लागले. एकांतवासाचा अनुभव घ्यावा लागला. ज्या नित्याच्या गरजा मानत होतो त्या खरे तर आपल्या गरजा नाहीतच मुळी याचीही जाणीव झाली. रस्ते सुनसान झालेले अनुभवले, मुलांच्या गोंगाटाने गजबजणाऱ्या शाळा स्तब्ध स्तब्ध झाल्या. बरच काही या आपत्कालीन परिस्थितीत अनुभवायला मिळालं.

या आपत्कालीन परिस्थितीत देखील साहित्य परिषद आपले कार्य न थांबवता वेगवान प्रवास करती झाली हे सांगताना निश्चितच आनंद वाटतो. आपत्तीला इष्टापत्ती मानून घराघरात कोंडलेल्या माणसांना विविध माध्यमातून तंत्रज्ञानाचा अवलंब करून संपर्क करत चार सुखाचे क्षण अनुभवण्याची संधी दिली. साहित्य क्षेत्राला नोंद घ्यावी लागेल असे पहिले ऑनलाईन साहित्य संमेलन बिनखर्चिक स्वरूपात जगद्‌गुरू तुकोबाराय साहित्य परिषदेने संपन्न करून दाखविले ते ही अगदी दिमाखदार पद्धतीने! साहित्य क्षेत्रातील ती ऐतिहासिक नोंद आहे. याचा परिषदेला सार्थ अभिमान वाटतो. डॉ. सुनंदा शेळके यांची 'गझल मैफिल', ज्ञानेश वाकुडकरांचा 'सखे साजणी' हा अनोखा उपक्रम प्रा. डॉ. साहेबराव खंदारे यांची 'लेखन कार्यशाळा' असे नानाविध उपक्रम या दरम्यानच्या काळात साहित्य परिषदेने ऑनलाईन आयोजित केले. साहित्य परिषदेच्या पदाधिकाऱ्यांशी झूम मिटींगच्या माध्यमातून नित्य संपर्क ठेवला. अनेक जिल्ह्यातून नवीन पदाधिकारी नियुक्त करून जिल्हा शाखा कार्यान्वित केल्या व साहित्य परिषदेचा विस्तार करण्याच्या दृष्टीने पावले उचलण्यात आली.

नवरात्रोत्सवात 'साहित्य जागर' हा नऊ दिवस नाविन्यपूर्ण उपक्रम आयोजित करून साहित्य

क्षेत्रात देदिप्यमान कामगिरी करणाऱ्या संत जनाबाई, महदंबा, अक्कमहादेवी, शांता शेळके, बहिणबाई चौधरी, डॉ. सरोजिनी बाबर, सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, तानुबाई बिर्जे या महिला शक्तींचा गौरव करून 'साहित्य जागर' मांडला. अत्यंत उत्स्फुर्तपणे नऊ जिल्हा शाखेतील पदाधिकाऱ्यांनी तो उपक्रम कमालीचा यशस्वी करून दाखविला.

'तुकोबावाणी'चा हा अंक नोव्हेंबर ते जानेवारी या कालावधीत प्रकाशित होतो आहे. त्यामुळेच महात्मा फुले यांचा नोव्हेंबर महिन्यात येणारा स्मृतीदिन लक्षात घेऊन प्रदेशाध्यक्षा डॉ. निर्मलाताई पाटील यांच्या जाणीवेने समावेश केलेला आहे.

राजमाता जिजाऊ मां साहेब या आपल्या प्रेरणास्थान. त्यांचा जन्मोत्सव या कालावधीत येतो आहे. लाखो समाजबांधव श्रद्धापूर्वक जिजाऊ जन्मोत्सवात गेल्या कैक वर्षापासून सहभागी होत आहेत. याचा सार्थ अभिमान आहेच. जिजाऊंचे जीवन कार्य सर्वांसाठीच प्रेरणादायी आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन देवून कर्मकांडाना मूठमाती देत स्वराज्याचे स्वप्न या मातीत या माऊलीने साकार केले व एक सर्व समावेशक राजा या मातीला ललामभूत ठरेल असा देवून मातृत्वाचा उत्तुंग इतिहास अधारेखित केला. त्यांचा जन्मोत्सव साजरा करताना भावना उचंबळून येणे स्वाभाविक आहे. भेटू या आपण सर्वजण १२ जानेवारीला "मातृतीर्थावर...." या अंकात कथा, कविता, लेख, साहित्य परिषद कार्य अहवाल यासह विविध प्रकारचे साहित्य देण्याचा प्रयत्न केलेला आहे. साहित्य पाठवून सहकार्य करणाऱ्या चळवळीतील सर्व बंधू भगिनींचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. या अंकाच्या मुखपृष्ठासाठी आमचे सन्मित्र शिवश्री शिवाजी हांडे यांना विनंती करताच आत्मीय भावनेने रेखाटलेले मुखपृष्ठ आपणास आवडे याची खात्री आहे. त्यांचे आभार मानून त्यांच्या भावनेचा उपमर्द करण्याची इच्छा नाही. काही ऋण हे पेलण्यातच धन्यता असते याची जाणीव आहे. बहुजन समाजाने लेखणी हाती घेवून आपल्या व्यथा, वेदना विविध प्रकारातून मांडण्याची नितांत आवश्यकता असलेला हा काळ आहे. आपण लिहिते व्हावे, आपले अनुभव मुक्तपणे अभिव्यक्त करावेत. त्यांना यथोचित प्रसिद्धी देण्याचा 'तुकोबावाणी' निश्चित प्रयत्न करील. त्यासाठीच हा अट्टाहास आहे हे विनम्रपणे सांगू इच्छितो. अंकाविषयीच्या प्रतिक्रिया जरूर कळवाव्यात. साहित्य पाठवून सहकार्य करावे.

सर्वांना मनस्वी सदिच्छा..... जय जिजाऊ!

शिवश्री बालाजी जाधव
उजेडकर
संपादक
संपर्क : ९७६७७०९२१३

# बळीमहोत्सव

संकलन - रामचंद्र सालेकर

दिवाळी हा सण भारताच्या बहुतांश भागातून तर साजरा केला जातोच, पण त्याबरोबरच भारतीय लोक जगातील ज्या विविध देशांतून स्थलांतरित झाले आहेत, आणि तेथे तात्पुरते वा कायमचे वास्तव्य करीत आहेत, त्या त्या ठिकाणीही तो साजरा केला जातो. हा सण अतिशय लोकप्रिय असा असून तो आपल्या संस्कृतीमधील अनेक घटनांशी संबंधित असल्यामुळे अनेक सणांचा एक समुच्चय असे त्याचे स्वरूप बनले आहे.



आपल्याकडे ऋतूंची गणना करतांना सहा ऋतू मानण्याची एक पद्धत आहे. प्रत्येक ऋतूचा काळ दोन महिन्यांचा मानला जातो. या गणनेनुसार आश्विन आणि कार्तिक या दोन महिन्यांचा मिळून शरद ऋतू मानला जातो. हा ऋतू सफलतेचे, समृद्धीचे आणि स्वप्नपूर्तीचे प्रतिक बनला आहे. प्राचीन भारतात शरद ऋतूपासून नव्या वर्षाची गणना करण्याची पद्धत होती. म्हणूनच 'जीवेत् शरदः शतम्' अशी सदिच्छा देण्याची प्रथा आपल्याकडे होती आणि आहेही. या ऋतूमध्ये पावसाळ्याची तीव्रता संपलेली असते. आकाश निरभ्र झालेले असते. नद्यांचे पूर ओसरल्यामुळे त्यांचे पाणी स्वच्छ आणि पारदर्शक बनलेले असते. महत्त्वाची गोष्ट म्हणजे खरीपाची बरीचे पिके निघालेली असतात वा निघण्याच्या बेतात असतात. याचा अर्थ हा वर्षातील पहिल्या सुगीचा आणि परिपक्वतेचा काळ असतो. त्यामुळे समाधानाचे वातावरण पसरलेले

असते. स्वाभाविकच, आनंदोत्सव साजरा करण्याच्या दृष्टीने हा काळ अनुकूल असतो. विविध पक्वान्ने, नवे कपडे, दिपांच्या रांगा इ. मार्गांनी लोक हा आनंद व्यक्त करतात.

...महाराष्ट्रामध्ये शेतकऱ्याला बळीराजा म्हटले जाते. हा शेतांमधील सुगीचा काळ असल्यामुळे या काळात भारतीयांचा प्रेरणापुरुष असलेल्या बळीराजाच्या आठवणी निघणे स्वाभाविक आहे. खरे तर दिवाळीचा हा सण अतिशय कृतज्ञतापूर्वक बळीमहोत्सव साजरा करण्याचा आहे. त्याचे मुळचे स्वरूप बळीराजाला आणि कृषीला केंद्रस्थानी ठेवून निश्चित करण्यात आले आहे. सध्या साजऱ्या केल्या जाणाऱ्या दिवाळीमध्येही कार्तिक शुक्ल प्रतिपदा ही बलिप्रतिपदा म्हणून साजरी केली जाते आणि कार्तिक शुक्ल द्वितीयेला भाऊबीज साजरी करण्याच्या दिवशी बहिण भावाला ओवाळताना ‘इडा पिडा टळो आणि बळीच राज्य येवो’ अशी सदिच्छा अंतःकरणपूर्वक व्यक्त करते. याचा अर्थ केरळमध्ये ज्याप्रमाणे सुगीचा सण असलेला ‘ओणम्’ साजरा केला जातो, तसेच दिवाळीचेही स्वरूप आहे.

आश्विन कृष्ण द्वादशी हा दिवाळीचा पहिला दिवस होय. या द्वादशीला ‘गोवत्सद्वादशी’ वा ‘बसुबारस’ असे म्हणतात. या दिवशी गाय आणि वासरू यांची पूजा करण्याची पद्धत आहे. या काळात ज्याप्रमाणे शेतांमधील धान्य घरी आलेले असते, त्याप्रमाणे दूधदुभतेही विपूल प्रमाणात मिळत असते. कृषीसंस्कृती आणि पशुपालनसंस्कृती यांचा निकटचा संबंध आहे. स्वाभाविकच, दिवाळीच्या या पहिल्या दिवशी आपल्याला दूधदुभते देणाऱ्या गायीगुरांविषयी कृतज्ञता व्यक्त केली जाते. शिवाय कृष्णाच्या गायी आणि वासरे यांच्याशी जो जिव्हाळ्याचा संबंध होता, त्याचे स्मरणही या निमित्ताने केले जाते.

...आश्विन कृष्ण त्रयोदशीला ‘धनत्रयोदशी’ म्हटले जाते. माणसाला आनंदाने उपजीविका चालविण्यासाठी धनाची आवश्यकता असतेच. ते एक अतिशय महत्त्वाचे साधन आहे. कष्ट करून योग्य मार्गाने मिळविलेले धन हे माणसाला सुरक्षितता, स्वावलंबन, स्वातंत्र्य आणि आनंद देणारे असते. अशा धनाविषयी कृतज्ञता व्यक्त करणे, हा धनत्रयोदशीचा अभिप्रेत अर्थ आहे. या दिवसाचे एक वेगळे महत्त्वही आहे. वैदिक परंपरेमध्ये दक्षिण दिशा अशुभ मानण्यात आली आहे. यामागे एक सांस्कृतिक इतिहास आहे. वैदिक लोक आणि त्यांना विरोध करणारे बळी वगैरेंचे अनुयायी यांच्यामध्ये एक दीर्घकाळ संघर्ष चालू होता. बळीचे अनुयायी दक्षिणेकडे सरकले होते. ते यज्ञयागांना विरोध करणारे होते. युद्धे होत, तेव्हा ते दक्षिणेकडून हल्ला करीत असत. वैदिकांना या हल्ल्यांची भिती वाटत असे. म्हणून ते भितीपोटी दक्षिण दिशेला अशुभ मानू

लागले होते. दक्षिण दिशेकडे तोंड करून दिवा लावू नये, अशी प्रथा रूढ करण्याइतका दक्षिण दिशेचा धसका त्यांनी घेतलेला होता. धनत्रयोदशीच्या दिवशी जाणीवपूर्वक दक्षिणेकडे तोंड करून दिवे लावले जातात. याचा अर्थ हा दक्षिण दिशेचा आणि तिकडे राहणाऱ्या अवैदिक लोकांचा गौरव करण्याचा उत्सव ठरतो.

दिवाळीच्या सणामध्ये आश्विन कृष्ण चतुर्दशी ही 'नरक चतुर्दशी' या नावाने प्रसिद्ध आहे. प्राचीन भारतात नरक नावाचे अनेक राजे होऊन गेले आहेत. त्यांच्यापैकी वैदिक इंद्राचा विरोधक असलेला अतिशय सामर्थ्यशाली, गुणसंपन्न आणि भ्रामक कर्मकांड वगैरेंना नाकरणारा एक महान राजा होऊन गेला आहे. तो राजा इंद्राच्या संस्कृतीपेक्षा पर्यायी अशी एक निकोप संस्कृती जपणारा होता. नरक चतुर्दशी हे नाव या राजाच्या नावावरूनच प्राप्त झाले आहे हे उघड आहे.

या नरक राजाला कृष्णाने मारले, अशा अर्थाच्या ज्या कथा काढळतात, त्या इतर अनेक कर्थाप्रमाणे कृष्णाच्या नावावर नंतर घुसडण्यात आल्या आहेत. नरक राजा आपले सामर्थ्य आणि सद्‌गुण यांच्या जोरावर आपले इंद्रपद हिरावून घेईल, अशी भिती इंद्राला वाटत होती. याचा अर्थ वैर होते ते वैदिक इंद्र आणि नरक राजा यांच्यामध्ये. परंतु इतिहास तशा पद्धतीने लिहिण्याऐवजी बहुजननायक असलेल्या कृष्णाने नरक राजाची हत्या केली, असे खोटेच लिहिण्यात आले, हे उघड आहे. कृष्णाची लोकप्रियता वापरून बहुजन समाजामध्ये बहुजनांचा नायक असलेल्या नरक राजाविषयी तिरस्कार निर्माण करण्याच्या हेतूने कृष्णाच्या नावाच्या वापर करण्यात आला. नरक राजाप्रमाणेच स्वतः कृष्ण इंद्रविरोधक होता, हे ध्यानात घेतले असता, कृष्ण इंद्रासाठी नरक राजाची हत्या करणे शक्य नव्हते. स्वाभाविकच नरक राजा आणि कृष्ण यांच्यातील वैर आणि युद्ध ही एक काल्पनिक गोष्ट ठरते. नरक राजा एक वेगळी संस्कृती चालवत असल्यामुळे त्याची बदनामी करण्यासाठी 'नरक' या शब्दाचा अर्थ 'मृत्यूनंतर यातना भोगण्याचे स्थान' असा करण्यात आला आणि तो शब्द भाषेमध्ये रूढ करण्यात आला.

नरक राजाचा पराभव वा अंत या दिवशी झाला होता, असे म्हणण्याला वस्तुनिष्ठ असा सबळ पुरावा नाही. तो इंद्रावरील त्याच्या विजयाचा दिवस होता. ज्या अर्थी त्या दिवसाला त्याचे नाव देण्यात आले आहे, त्या अर्थी तो दिवस त्याच्या गौरवाचा, महात्म्याचा आणि जयजयकाराचाच आहे, हे उघड आहे. त्या दिवशी कृष्णाने त्याला मारले असते तर तो दिवस कृष्णाच्या जयजयकाराचा झाला असता आणि त्या दिवसाला नरकाचे नाव देण्याऐवजी कृष्णाचे दिले गेले असते किंवा इंद्राचे दिले गेले असते. या घटनेशी कृष्णाचा संबंध नाही हे तर उघडच आहे.

नरक चतुर्दशीच्या दिवशी नरक राजाची आठवण जागवणे, त्याला आदरांजली अर्पण करणे आणि त्याच्याविषयीची आपली कृतज्ञता व्यक्त करणे, यासाठी दिप प्रज्वलित केले जातात. असा उत्सव साजरा करण्यामागे एक खास धारणा असते. एक वर्षापूर्वी त्या व्यक्तीचे स्मरण करून तिच्याकडून जी प्रेरणा घेतलेली असते, ती वर्षभरामध्ये काळाचा परिणाम म्हणून काहीशी क्षीण झालेली असते. म्हणून एक वर्षानंतर पुन्हा त्या प्रेरणेचे नुतनीकरण करणे आणि ती ताजेपणाने आपल्या अंतर्यामी धारण करून पुढच्या वर्षासाठी नव्याने ऊर्जा संकलित करणे, असा याचा अर्थ असतो. नरक चतुर्दशीच्या निमित्ताने नरक राजाच्या चरित्रातून अशी प्रेरणा घेणे, हे उचित होय. एक प्रकारे त्या दिवशी नरक राजाचे आपल्या जीवनात पुनरागमन होते, म्हणून त्याचे स्वागत करण्याचा दिवस या दृष्टिनेही आपण या दिवसाकडे पाहू शकतो.

आश्विन अमावास्येला लक्ष्मीपूजन केले जाते. लक्ष्मी या शब्दाचे अनेक अर्थ आहेत. या संदर्भात धनसंपदा, वैभव, समृद्धी हा या शब्दाचा अर्थ आहे. धनत्रयोदशीच्या संदर्भात धनाविषयी जे म्हटले, तेच लक्ष्मीपूजनालाही लागू पडते. यामध्ये आणखी काही गोष्टींची भर घालणेही आवश्यक आहे.

लक्ष्मीपूजन हे मुळचे 'निर्ऋतिपूजन' होते. 'निर्ऋति' ही सिंधु संस्कृतीच्या काळातील एक अतिशय महान स्त्री होती. आज लक्ष्मी ज्या समृद्धीचे प्रतिक मानले जाते, त्या समृद्धीची खऱ्या अर्थाने निर्मिती करण्याचे महान कार्य प्राचीन काळात बहुजन समाजातील अतिशय श्रेष्ठ अशा निर्ऋती नावाच्या स्त्रीने केले होते. यज्ञयागासारख्या चाकोरीबद्ध कर्मकांडाचा अंगीकार करण्याऐवजी तिने समाजरचनेत सर्व प्रकारच्या नवनिर्मितीच्या संकल्पना कार्यान्वित करण्याचे कार्य केले होते. नवनिर्मितीच्या या कार्यामुळेच तिची पृथ्वीबरोबर तुलना केली जात असे. स्वाभाविकच 'निर्ऋती' या शब्दाचे 'आनंद देणारी', 'पृथ्वी' असेही अर्थ झाले होते. या निर्ऋतीच्या बहुजनांची महान पूर्वज जी पार्वती तिच्याशीही निकटचा संबंध होता. नवनिर्मिती, समृद्धी, उज्ज्वल यश आणि आनंद यांचे प्रतीक असलेली ती बहुजनांच्या जीवनाला विधायक दिशा देणारी आहे. भारतीयांच्या आद्यमातांपैकी ती एक आहे.

निर्ऋतीचे आपल्या सांस्कृतिक जीवनातील हे अतिशय उदात्त स्थान पाहता आपण या दिवशी निर्ऋतीच्या गौरवाचा उत्सव साजरा करावा.

या दिवशी केरकचरा काढण्याचे साधन असलेल्या केरसुणीची पूजा केली जाते. ही पुजा करताना तिलाच लक्ष्मी मानले जाते. या प्रथेचा

अर्थ आपण काळजीपूर्वक समजून घेतला पाहिजे. केरसूणी स्वच्छता निर्माण करते. जेथे स्वच्छता असते, तेथे आरोग्य, प्रसन्नता, मनःशांती, सौंदर्य आणि खरीखुरी समृद्धीही येते. हा स्वच्छतेचे महत्त्व मनावर बिंबविण्याचा संस्कार आहे. पण त्याबरोबरच आपल्याला स्वच्छता देणाऱ्या एका निर्जीव साधनाचीही कृतज्ञतापूर्वक पूजा करणे, ही कृती आपल्याला एक फार महत्त्वाचा संदेश देणारी आहे. श्रमाचा द्वेष करता कामा नये. श्रमातून, कष्टातून मानवी जीवन स्वच्छ आणि सुखी होते. निर्जीव साधनाचीही अशी पूजा करायचे असेल, तर सर्व प्रकारच्या श्रमजीवी लोकांविषयी आणि त्यातही समाजातील ज्या व्यक्ती इतरांना स्वच्छ आणि प्रसन्न जीवन लाभावे म्हणून अस्वच्छता दूर करण्याचे श्रम करतात. त्यांच्याविषयी आत्मीयता आणि कृतज्ञता बाळगणे, हा अतिशय उदात्त संदेश या प्रथेतून घेता येतो.

आश्विन अमावास्येलाच भारताचे एक अतिशय महान सुपुत्र तीर्थंकर वर्धमान महावीर यांना निर्वाण प्राप्त झाले. त्यांचा उपदेश मानव जातीसाठी हितकारक आणि कल्याणकारक आहे. प्रकाश हे ज्ञानाचे प्रतीक असते आणि वर्धमान महावीरांनी जो ज्ञानाचा आणि मानवी मूल्यांचा उपदेश केला तो सदैव प्रकाशमय राहणार आहे. त्यांचा हा उपदेश सर्व लोकांपर्यंत पोचावा आणि तो पोचविण्यासाठी आपलाही हातभार लागावा, ही भावना या दिवशी आपल्या मनात उत्कट स्वरूपात जपता येते.

जैन परंपरेमध्ये महावीरांच्या निर्वाणाचा निर्देश 'निर्वाणकल्याणक' या शब्दाने केला जातो. त्यांचा जन्म, त्यांची ज्ञानप्राप्ती इ. घटना जशा लोकांचे, प्राणीमात्रांचे कल्याण साधणाऱ्या मानल्या जातात, तसेच त्यांचे निर्वाणही कल्याणकारक मानले जाते आणि म्हणूनच त्याचा निर्देश 'निर्वाणकल्याणक' या शब्दाने केला जातो.

निर्वाणकल्याणकाची संकल्पना आपल्याला जीवन आणि मृत्यू यांच्याविषयी एक आगळा आणि प्रसन्न दृष्टिकोन देणारी आहे. अनेकांतवादाच्या दृष्टीनेच पहायचे, तर जैन परंपरेत ज्याला एका दृष्टीने निर्वाण म्हटले जाते, तो दुसऱ्या दृष्टीने देहाचा अंत असतो, मृत्यू असतो. पण परिपूर्ण जीवन जगून झाल्यानंतरच्या मृत्यूकडे विघातक म्हणून न पाहता, त्याला विनाशक न मानता, त्याला कल्याणक मानणे हे मृत्यूलाही अवीट सौंदर्य देणे आहे. म्हणूनच महावीरांच्या निर्वाणानंतर लोकांनी दीपोत्सव साजरा केला आहे. या दीपोत्सवाची अनेक वर्णने आढळतात. नमुना म्हणून इथे काही वर्णनांचे स्वरूप पाहू या. जैन परंपरेतील 'हरिवंशपुराण' या ग्रंथात या प्रसंगाचे वर्णन पुढीलप्रमाणे केल्याचे उल्लेख आढळतात.

ज्वलत्प्रदीपालिकया प्रवृद्धया सुरासुरैः दीपितया प्रदीप्तया ।

तदा स्म पावानगरी समन्ततः प्रदीपिताकाशतला प्रकाशते।। हरिवंशपुराण ६६।१९।।

अर्थ : त्या वेळी (महावीरांचे निर्वाण झाले त्यावेळी) सुर आणि असूर यांनी प्रदीपांच्या (मोठमोठ्या दिव्यांच्या) मालिका प्रज्वलित केल्या. त्या खूप मोठ्या झाल्या, त्या दिपित झाल्या (झळाळू लागल्या) प्रदीप्त झाल्या. (अतिशय प्रकाशित झाल्या). त्यामुळे, जिच्यावरचे आकाश सर्व बाजूंनी प्रदीपित झाले होते, अशा पावानगरीत सर्व आसमंत प्रकाशित झाला.

जैन साहित्यात महावीरांच्या निर्वाणाचे वर्णन पुढीलप्रमाणे करण्यात आल्याचे आढळते : ....घरोघर दीप पाजळले गेले. रस्तोरस्ती दीप तेजाळले गेले. जिकडे तिकडे दीपच दीप दिसू लागले. दीपांची रांगच रांग प्रकाशू लागली. दीपांच्या पंक्ती जागोजागी चमकू लागल्या. ते पाहून लोक नाचू लागले. भक्त गाऊ लागले. ‘नमः श्री वर्धमानाय’ चा जयघोष दाही दिशांतून घुमू लागला. या अविस्मरणीय आनंदाला नाव देण्यात आले ‘दीपावली’. त्या दिवसाला नाव मिळालं ‘दिवाळी’, आनंदाची दिवाळी, ज्ञानाची दिवाळी, मोक्षसुखाची दिवाळी, भगवान महावीरांच्या निर्वाणीची दिवाळी. अमावास्या असून देखील त्या वेळी जगभर पसरलेल्या उद्योताचे प्रतीक - स्मृतीचिन्ह म्हणून आजतागायत सामान्य जनता या दिवशी दिव्याच्या ज्योती उजाळून हा आगळा आनंदमहोत्सवी सण अखंड साजरा करीत आली आहे. अखंड साजरा करीत राहणार आहे.

मृत्यूकडे पाहण्याची ही दृष्टी अतिशय सुखद आहे. एका दृष्टिने हे महावीरांनी उपदेशिलेल्या अनेकान्तवादाचे मधुर फळ आहे. मृत्यू हा जीवनाचा शेवट नसून ती जीवनाची परिपूर्णता आहे, परिपक्वता आहे, खरे तर मृत्यू हीच मृत्यूवरची मात आहे, मृत्यूचा पराभव आहे, मृत्यूच्या पलिकडे जाणे आहे. म्हणून हा क्षण दुःखाचा नसून आनंदाचा आहे. बाहेर अमावास्येचा अंधार पसरल्यासारखे दिसत असले, तरी ती प्रत्यक्षात निर्वाणाच्या प्रकाशाची पौर्णिमा आहे. तो मानवी अस्तित्त्वाचा परमोच्च बिंदू आहे, विकासाची सर्वोच्च अवस्था आहे, आनंदाची परम सीमा आहे!

दिवाळीचे हे प्रकाशमय आणि आनंददायक स्वरूप भारतीय संस्कृतीला एक असाधारण तेज देणारे आहे.

विजयादशमी आणि बलिप्रतिपदा या दोन्ही दिवशी बळीराजाचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करून आपल्यासाठी उमदी प्रेरणा घेण्याचे विधायक, भावात्मक आणि आपल्या सर्जनशीलतेची अभिव्यक्ती करणारे उपक्रम आयोजित करावेत. या काळात आपली मने बळीराजाच्या आणि बळीराजासारख्या आपल्या प्रेरणास्थानांच्या विचारांनीच भरलेली आणि भारावलेली असावीत.

आपल्या मनामध्ये अशा वेळी नको त्या व्यक्तींच्या थोड्याशा स्मरणालाही वाव असू नये. आपली मने प्रसन्न रहावीत, यासाठी हे आवश्यक आहे. म्हणून या काळात कोणाच्या प्रतिमांचे दहन करणे वगैरेसारखे नकारात्मक उपक्रम अजिबात करू नयेत.

'भाऊबीज' हा अनेक दिवस चालणाऱ्या दिवाळीच्या सणातील प्रत्यक्ष रित्या शेवटचा दिवस होय. भाऊ आणि बहीण यांच्यातील रक्ताच्या आणि जिव्हाळ्याच्या नात्याचे नुतनीकरण आणि दृढीकरण असे त्याचे स्वरूप आहे. बीज म्हणजे द्वितीया. कार्तिक शुक्ल द्वितीयेला हा सण साजरा केला जात असल्यामुळे त्याला 'भाऊबीज' असे नाव देण्यात आले आहे. आपल्या सध्याच्या समाजव्यवस्थेमध्ये मुलीला आयुष्याच्या विशिष्ट टप्प्यावर लग्न करून माहेरातून सासरी जावे लागते. हे स्थित्यंतर अटळ आहे. मुलगी सासरी गेल्यानंतर तिचे जीवन अनेक दृष्टींनी बदलते आणि ती क्रमशः सासरच्या जीवनाशी एकरूप होऊन जाते. असे असले तरी जिथे जन्म झला आणि जिथे लग्नापूर्वी सगळे आयुष्य व्यतीत झाले, त्या स्थानाबरोबरचे आणि तिथल्या व्यक्तींबरोबरचे सगळे नाते कधच तुटन नाही. ती सासरी पूर्णपणे सुखी समाधानी असली, तरी देखील माहेरबरोबरच्या नात्याची जपणूक करण्यामध्ये तिला एक विलक्षण आनंद मिळत असतो. सासरी ती अडचणीत वा दुःखात असली तरी तिला माहेरच्या ममतेची गरज असते. दुसऱ्या बाजूने भावाला आपले घर साडून अशाप्रकारचे स्थित्यंतर करावे लागत नसले तरी देखील आपल्या कुटुंबाचा आणि भावविश्वाचा एक अतिशय निकटचा भाग असलेली बहिण आपले घर सोडून दुसरीकडे गेल्यानंतर त्यालाही आपल्या जीवनाच्या परिपूर्णतेसाठी बहिणीविषयीचा जिव्हाळा जपण्याची भावनिक गरज वाटतच असते. अशा रितीने वेगवेगळ्या ठिकाणी आपापल्या संसारात स्थिरावल्यानंतरही भाऊ आणि बहिण यांना आपले नाते जपण्याची उत्कट इच्छा असते. लग्नापूर्वीही ते जपलेले असते आणि लग्नानंतरही ते जपण्याचा क्रम चालू ठेवण्याची आवश्यकता त्यांना जाणवत असते. जिव्हाळ्याची ही जपणूक व्यक्त करण्याचे एक हृद्य प्रतिक म्हणजे भाऊबीज हा सण होय. या प्रकारच्या भावनेतून हा सण साजरा करून भाऊ आणि बहिण यांच्या नात्याला दृढता देणे हे योग्य आहे.

दिवाळीचा सण साजरा करताना कोणत्याही प्रकारचे प्रदूषण होणार नाही, याची काळजी घ्यावी. पैशांची उधळपट्टी, संपत्तीचे अनुचित प्रदर्शन, कर्ज काढून सण साजरा करणे इ. अनिष्ट प्रकारही टाळावेत.

- रामचंद्र सालेकर (संकलक)
(सौजन्य - शिवधर्म गाथा)

# माँ साहेब आम्हाला माफ करा



माँसाहेब, आम्हाला माफ करा
विसरून गेलोत इतिहास आम्ही
विसरून गेलोत पराक्रम
आमच्या डोळ्यात पाणी झालेय,
...त्याची तेवढी वाफ करा
माँसाहेब, आम्हाला माफ करा.

ज्यांनी शहाजींचा वसा घ्यायचा
तेच बोंबलत हिंडत आहेत
घराघरातल्या आजच्या जिजाऊ
सासवांसोबत भांडत आहेत
हे सारे बदलण्यासाठी
कुणातही टाप नाही
तुम्ही तेवढी टाप नाही
माँसाहेब, आम्हाला माफ करा.

घराघरातल्या शिवाजी
व्हिडीओ गेम खेळतो आहे
जंक फूड खाऊन खाऊन
टीव्ही समोर लोळतो आहे
घराघराचा कार्टून शो होतोय
हा बॅड शो तेवढा फ्लॉप करा
माँसाहेब, आम्हाला माफ करा

बाहेर खेळायला जावे तर
कुठे मावळ्यांचा पत्ता आहे?
साचलेल्या उकंड्यावरती
कावळ्यांचीच सत्ता आहे
कृपया, घर आणि डोक्यातील
उकांडे तेवढे साफ करा
माँसाहेब, आम्हाला माफ करा.

राम-कृष्णाचा वारसा सांगून
पुढच्या गोष्टी तुम्हाला
अगदी सोप्याकरता आल्या
इथली ईरसाल लेकरं सांगतील
आई-बापांच्या सहकार्यामुळेच
आम्हाला कॉप्या करता आल्या
आईबापांचेही खरे आहे
कशाला म्हातारपणी ताप करा?
माँसाहेब, आम्हाला माफ करा.

आंधळ्या परंपरेचे
इथे सगळे पाईक आहेत
कितीही ओरडून सांगा
सारे बहिरोजी नाईक आहेत
किटलेल्या कानातला मळ
तेल ओतून साफ करा
माँसाहेब, आम्हाला माफ करा

राजेपद वारसा हक्काने मिळते,
पण शिवबा घडवावा लागतो
जाणतेपणाचा दुर्मिळ गुण
दागिण्यासारखा घडवावा लागतो
जरा मर्यादा सोडून वागतोय
संभाजी राजासारखा नातू मागतोय
आम्हाला तुमच्या सारखी आई
शहाजी राजांसारखा बाप करा
माँसाहेब, आम्हाला माफ करा..


- सुर्यकांत डोळसे, पाटोदा (बीड)
संपर्क : ९९२३८४७२६९

# राष्ट्रपिता महात्मा फुले आणि समाज परिवर्तन

- डॉ. निर्मला सुधीर पाटील

राष्ट्रपिता म. फुले यांचा २८ नोव्हेंबर हा स्मृतीदिन. म. ज्योतिबा फुले यांचे जीवन व कार्य आपण समजून घ्यायला लागतो त्यावेळी आपणास जाणवते की, त्यावेळच्या परिस्थितीशी, सामाजिक प्रश्नांशी त्यांनी अत्यंत कडवी झुंज दिलेली आहे. अज्ञान, अंधश्रद्धा, अन्याय, जाचक रूढी, परंपरा, महिलांचे प्रश्न, शेतकऱ्यांच्या समस्या, पारतंत्र्य, मानसिक गुलामगिरी, कामगारांचे प्रश्न इ. गोष्टीचा त्यांनी अभ्यास करून ते सोडविण्याचा यशस्वीपणे प्रयत्न केलेला आहे.

बहुजन समाजाचे प्रबोधन, परिवर्तन झाल्याशिवाय व कमीत कमी त्यांना प्राथमिक शिक्षण मिळाल्याशिवाय हे प्रश्न सुटणार नाहीत हे त्यांनी जाणले आणि प्रथम शिक्षणाच्या बाबतीत ते आग्रही राहिले. सन १८८२ ला इंग्रज सरकारने सर विलियम हंटर यांचे अध्यक्षतेखाली 'भारतीय शिक्षण आयोग' निर्माण केला होता. यालाच हंटर आयोगही म्हणतात. प्राथमिक शिक्षण सक्तिचे व मोफत करण्यासाठी म. फुल्यांनी हंटर आयोगाला धारेवर धरले. बहुजन समाजातील प्रत्येक मुलाला वयाच्या १२ व्या वर्षापर्यंत सक्तीचे व मोफत शिक्षण देण्यात यावे, असे निवेदन त्यांनी दिले. म. ज्योतीबा फुले यांनी मांडलेला हा विचार बहुजन समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्याला एक नवीन वळण देणाराख क्रांतीकारी विचार ठरलेला आहे. म्हणूनच त्यांना बहुजनांच्या शिक्षणाचे आद्य जनक म्हणतात. पुढे त्यांनी स्त्री शिक्षणाच्या



बाबतीतही पुढाकार घेतला. समाजातील प्रत्येक स्त्रीने शिक्षण घेतल्याशिवाय समाजपरिवर्तन शक्य नाही हे त्यांनी जाणले. एक स्त्री शिकली तर संपूर्ण कुटुंब सुशिक्षित होते यावर ते ठाम होते. याची सुरुवात त्यांनी आपल्या सुविद्य पत्नी सावित्रीबाई यांचेपासून केली. सावित्रीबाईंना त्यांनी प्रथम लिहायला वाचायला शिकवले आणि त्यानंतर १८४८ साली देशातील पहिली मुलींची शाळा सुरू झाली. सावित्रीबाई या पहिल्या स्त्री शिक्षिका आहेत. शिक्षिका म्हणून त्यांच्या जीवनाची सुरुवात अत्यंत खडतरपणे झाली. मुलींना शिकवण्यासाठी शाळेत जात असताना कर्मठ ब्राह्मण त्यांना शिव्या, शाप देवू लागले. त्यांच्या अंगावर शेण, खरकटे, चिखल, दगड फेकले जाऊ लागले तरीही त्या आपल्या ध्येयापासून विचलित झाल्या नाहीत. उलट अशा समाज कंटकांना त्यांनी चांगलाच धडा शिकविला. फुले पती-पत्नींनी ज्ञानदानाचे कार्य विनावेतन केलेले आहे. अन्नपूर्णा जोशी, माधवी थत्ते, सोनु पवार, जनी कर्डिले, सुमती मोकाशी, दुर्गा देशमुख या त्यांच्या पहिल्या विद्यार्थिनी. भारतातील पहिल्या महिला पत्रकार व संपादक तानुबाई बिर्जे याही त्यांची विद्यार्थिनी आहेत. सावित्रीबाई फुले या विद्येची स्फूर्तीनायिकाच आहेत.

त्याकाळी स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हताच. शिवाय धर्मव्यवस्थेने स्त्रियांवर अमानुष निर्बंध घातले होते. स्त्री म्हणजे दासी, गुलाम, एक उपभोग्य वस्तू याशिवाय तिच्याबाबतीत वेगळी विचारसरणी नव्हती. बालविवाह, केशवपन, विधवा विवाह बंदी यामुळे स्त्रीचे जीवन अक्षरशः होरपळून निघाले होते. पण महात्मा फुले व सावित्रीमाईमुळे स्त्रीयांना शिक्षणाची संधी मिळाली व त्यांना आज एक माणूस म्हणून वागणूक मिळत आहे. आज स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात आपले कर्तृत्व दाखवित आहेत. आम्ही स्त्रीयांवर या दोन महामानवांचे अनंत उपकार आहेत. स्त्री शिक्षणाचा पाया या दोघांनीच घातला आहे.

त्यावेळी बालविधवा झालेल्या मुलींचा गैरफायदा घेऊन अनेकजण त्यांच्याशी अनैतिकता करत. यातूनच या मुली गरोदर राहत. या मुलींना आत्महत्या करणे किंवा आपल्या मुलाला अज्ञात ठिकाणी सोडणे हे दोनच पर्याय असत. या घटनांमुळे या पती-पत्नींचे अंतःकरण हेलावून जाई. त्यांनी १८३६ साली बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. अशा अनैतिक प्रसंगातून जन्मलेल्या जवळ-जवळ १०० बालकांचा सांभाळ या दोघांनी केलेला आहे. त्यांना स्वतःस मुलबाळ नव्हते. त्यांनी काशीबाई नातू या ब्राह्मण विधवेचा मुलगा यशवंत हा दत्तक घेतला.

अकाली वैधव्य आलेल्या मुलींचे केशवपन करण्याची प्रथा त्यावेळी होती. हे करत असताना

मुली आक्रोश करीत असत. तरीही जबरदस्तीने त्यांचे मुंडन केले जात असे. मातृहृदयी जोतिबांच्या मनाला या गोष्टीच्या यातना होत. त्यावेळी त्यांनी नाभिक समाज बांधवांना संघटित करून त्यांचे मतपरिवर्तन केले. हे सर्व नाभिक म. फुल्यांच्या पाठिशी ठामपणे राहिले आणि ही प्रथा बंद पडली.

१८७६-७७ साली मोठा दुष्काळ पडला होता. त्यावेळी या महान पतीपत्नींनी अन्नछत्र चालू केले. सावित्रीमाई स्वतः भाकरी बनवत असत. दुःखी-कष्टी जनतेला त्यांनी फक्त मानसिक आधार दिला नाही तर त्यांच्या पोटाची भूकही भागविली. इतका मोठा दुष्काळ पडला असतानाही सावकर या जनतेवर अतोनात जुलूम करीत होते. त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असतानाही सावकारशाही चालू होती. ही गोष्ट म. फुल्यांनी सरकार दरबारी निदर्शनास आणून दिल्यावर सरकारने १८७९ ला 'किसान राहत कानून' निर्माण केला आणि सर्व जनतेस कर्जमुक्त केले.

या देशातील शेतकरी, कष्टकरी, मजूर व कामगार लोकांकडून अतोनात कष्ट करून घेतले जाई पण या कामाचा योग्य मोबदला त्यांना मिळत नसे. म्हणून देशातील पहिली कामगार संघटना म. फुलेंनी काढली व नारायण मेघाजी लोखंडे यांना या संघटनेचे अध्यक्ष केले.

समाजामध्ये जन जागृती व्हावी, गुलामगिरी नष्ट व्हावी, अंधश्रद्धेतून समाज मुक्त व्हावा म्हणून म. फुलेंनी 'सत्यशोधक समाज'ची स्थापना केली. गावागावातून या संघटनेला खूप मोठा प्रतिसाद मिळू लागला.

छ. शिवाजी महाराज हे म. फुलेंचे प्रेरणास्थान होते. त्यावेळी छ. शिवरायांची समाधी दृष्टिआड गेलेली होती. १८६९ साली स्वतः महात्मा फुले रायगडावर गेले. महाराजांची समाधी शोधून काढली. तो परिसर स्वच्छ केला आणि त्यावर फुले वाहिली पण तेथील ग्रामजोशीस म. फुलेंची ही कृती आवडली नाही. त्याने समाधीवरील फुले उडवून लावली. म. फुलेंना या गोष्टीचे खूप वाईट वाटले. रयतेच्या या राजाचा इतिहास सर्व समाजास समजावा म्हणून त्यांनी महाराजांवर अभ्यासपूर्ण पोवाडा रचला आणि प्रथम शिवजयंती सुरू केली. म. फुले छ. शिवरायांबरोबर गौतम बुद्ध व बळीराजांचे पण निस्सीम भक्त होते. गुलामगिरी या पुस्तकात त्यांनी या मुक्तिदात्यांचा इतिहास मांडलेला आहे.

मु. फुले हे विज्ञाननिष्ठ, जागतिक कीर्तिचे तत्त्वज्ञानी व थोर साहित्यिक होते. त्यांनी गुलामगिरी, तृतीय रत्न, शेतकऱ्यांचा आसूड, ब्राह्मणांचे कसब, सार्वजनिक सत्यधर्म, छ. शिवरायांचा पोवाडा इ. ग्रंथ लिहिले. त्यांची प्रेरणा घेऊन त्यांच्या कार्याने व साहित्याने प्रेरित होऊन या समाजामध्ये कितीतरी विचारवंत, समाजसुधारक,

साहित्यिक तयार झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, राजर्षी शाहू महाराज, भास्करराव जाधव, संत गाडगेबाबा, मामासाहेब जगदाळे, डॉ. बापूजी साळुंखे, डॉ. पंजाबराव देशमुख इ. चे प्रेरणास्थान, गुरूस्थान महात्मा ज्योतिबा फुले हे होते.

म. फुले एक उत्तम बांधकाम तज्ज्ञ होते. पुण्यातील अनेक पूल, कात्रज घाट, खडकवासला धरण, मुंबईचे छ. शिवाजी महाराज स्टेशन इ. बांधकाम त्यांनी केलेले आहे. दिवस-रात्र ते कष्ट करीत असत. त्यांचे पैसा मिळविणे हे ध्येय असते तर ते देशातील एक श्रीमंत व्यक्ति ठरले असते. पण त्यांनी हा पैसा समाजकार्यासाठी वापरला. शाळा काढण्यासाठी, समाज प्रबोधनासाठी वापरला. त्यांच्यामुळे बहुजन समाजातील कितीतरी लोक श्रीमंत झाले.

म. फुलेंच्या प्रत्येक कार्यात सावित्रीबाई फुले बरोबरीने होत्या. त्याही थोर साहित्यिका, कवयित्री होत्या. म. फुलेंच्या निधनानंतर खचून न जाता धाडसाने त्यांनी आपल्या पतीचे कार्य शेवटपर्यंत चालूच ठेवले. सत्यशोधक समाजाची धुराही त्यांनी समर्थपणे घेतली. १८९३ ला सत्यशोधक समाजाचे सासवड येथे अधिवेशन झाले. त्याचे अध्यक्षपद सावित्रीबाईंनी भूषविले होते.

१८९७ ला पुण्यात प्लेगची भयंकर साथ आली होती. सावित्रीबाई या रुग्णांची अहोरात्र सुश्रुषा करीत होत्या. त्यांना ओषधोपचारासाठी यशवंतकडे घेऊन येत होत्या. हे करीत असतानाच त्यांनाही प्लेगची लागण झाली आणि यातच त्यांचे १० मार्च १८९७ रोजी निधन झाले. सावित्रीबाईच्या आयुष्यातील पहिली ९ वर्षे सोडली तर पुढील ५७ वर्षे अखंडपणे त्यांनी ज्ञानदानाचे, समाजसेवेचे, समाजप्रबोधनाचे समाजपरिवर्तनाचे काम केलेले आहे.

म. जोतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले ही जगातील एक आदर्श पती-पत्नीची जोडी. संपूर्ण जीवन त्यांनी निःस्वार्थीपणे समाज कार्यासाठी वाहिले आणि त्यांच्या या कार्यामुळेच आज बहुजन समाज मानाने, अभिमानाने जगत आहे. अशा या थोर साहित्यिकांच्या, शिक्षणतज्ज्ञांच्या, क्रांतीकारकांच्या कार्याला, कर्तृत्वाला, विचाराला विनम्र अभिवादन!

- डॉ. निर्मला सुधीर पाटील, सांगली
प्रदेशाध्यक्षा
जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषद
महाराष्ट्र
संपर्क : ९८२२७२५६७८

# स्त्रीवादी विचारवंत : ताराबाई शिंदे

- प्रा. शैलजा बरुरे

**प्रस्तावना :**

आजच्या महाराष्ट्रातील बेरार प्रांतातील बुलढाणा जिल्ह्यात ताराबाई शिंदे यांचा १८३० साली जन्म झाला. तत्कालीन भारतीय समाजातील स्त्री-पुरुषांच्या गुणअवगुणांची तुलना करणारा 'स्त्री-पुरुष : तुलना' हा निबंध त्यांनी लिहिला. या निबंधामुळे स्त्री आणि पुरुष हे समान पातळीवरती गुणदोषांसहित स्विकारले पाहिजेत, अशी आग्रही मांडणी केल्यामुळे व तत्कालीन समाजात या निबंधाचे महात्मा फुले यांनी आपल्या १८८५ च्या 'सत्सार अंक २' मध्ये जाहीरपणे कौतुक केल्यामुळे ताराबाई शिंदे भारतातील अग्रणी स्त्रीवादी विचारवंत म्हणून मान्यता पावलेल्या आहेत.




१८८२ साली ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री-पुरुष : तुलना' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात तत्कालीन समाजातील स्त्रियांच्या दुःखाचे विश्लेषण करतांना ताराबाईंनी समाजव्यवस्था, कुटुंबव्यवस्था, धर्मव्यवस्था, अर्थव्यवस्थेची चिकित्सा अतिशय परखडपणे केली आहे. पुरुषवर्चस्ववादी मानसिकता, धर्मबंधने, धर्मनियंत्रणे, अनिष्ट रुढी परंपरा व स्त्रियांना कायम दुय्यमत्व लादण्यासाठी या सर्व घटकांचे संघटन यावर आपल्या लेखणीद्वारे ताराबाईंनी अक्षरशः आसूड ओढले. १८८२ साली एखाद्या बहुजन स्त्रीने समाजाची केलेली चिकित्सा धाडसाची तर होतीच पण ताराबाईंना व या निबंधाला कठोर टिकेला, निंदेला सामोरे जावे लागले. 'सत्सार अंक - २' शिवाय या निबंधाची चर्चा १८९५ मध्ये बीजिंग येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत झाली. ताराबाईंना जागतिक स्तरावर आद्य स्त्रीवादी लेखिका म्हणून मान्यता देण्यात आली. या ग्रंथामुळे जागतिकस्तर ते

महाराष्ट्रस्तरापर्यंत अनेक परिणाम झाले. महाराष्ट्रात स्त्रियांची विशेषतः विधवा, कुमारिका, परित्यक्त्या, बालविधवा यांची आक्रोश आणि दुःखाला वाचा फोडणारी साहित्य परंपरा निर्माण झाली. उदा. अण्णा मार्तंड जोशी यांचे संगीत सौभाग्य अथवा वैधव्य दुःख विवेचन (१८८४), गो. ब. देवल यांचे संगीत शारदा (१८९९), शा. शं. जोशी यांचे तरुणी दुःख परिहार ही १८९३ ची नाटिका इत्यादीमधून सर्व स्तरातील स्त्रियांच्या दुय्यमत्वाची, शोषणाची चर्चा साहित्यातून होऊ लागली. यापूर्वी म. ज्योतिबा फुले यांनी आपल्या लेखनाद्वारे पुरुषप्रधान व्यवस्था, जातिव्यवस्था, कर्मकांड यामुळे स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराला वाचा फोडण्याचे कार्य केलेच होते. स्त्रियांमध्ये शिक्षणाच्या माध्यमातून आत्मभान, आत्मसन्मान निर्माण करण्याच्या म. फुले यांच्या प्रयत्नांना ताराबाई शिंदे यांच्या लेखनाद्वारे यश मिळताना दिसत होते, कारण ताराबाई शिंदे यांचे माहेरचे कुटुंब सत्यशोधक विचार परंपरेतील होते. अनेक सत्यशोधक कार्यकर्ते यांच्याशी चर्चा, वादविवाद करण्याची संधी ताराबाईंना मिळालेली होती.

ताराबाई शिंदे या स्वतःला अल्पशिक्षित म्हणवत असल्या तरी त्यांचा व्यासंग दांडगा होता. विविध ग्रंथ व साहित्याच्या चिकित्सेतून त्यांचा 'स्त्री-पुरुष : तुलना' हा केवळ ५२ पानांचा निबंध स्त्रीकेंद्री विचाराला प्रेरणा देणारा ठरला. 'स्त्री-पुरुष : तुलना' या ग्रंथाच्या प्रस्तावनेतच ताराबाई शिंदे या आपण केवळ स्त्रीवादीच नव्हे तर मानवतावादी असल्याचे वाचकांच्या निदर्शनास आणून देतात. ज्याप्रमाणे पुरुषांमध्ये दोष किंवा वैगुण्य असते, त्याप्रमाणे स्त्रियांमध्ये असतेच कारण या दोहोंचा निर्माता एकच असतो. ही तुलना केवळ कुठल्या जाती किंवा कुळांची नाही तर समस्त स्त्रीपुरुषांची आहे असे सांगून महाराष्ट्रातील एक अल्पशिक्षित स्त्री वैश्विक व्यक्तिमत्त्वाचा पुरावा देते.


ताराबाई शिंदे यांनी प्रसारमाध्यमातील अबला स्त्रियांविरुद्धच्या दोषारोप करणाऱ्या लिखानाला उत्तर देण्यासाठी या ग्रंथाची निर्मिती केलेली आहे. हे प्रस्तावनेतच नमूद केलेले आहे. बालविवाह, विधवा पुनर्विवाहाला बंदी, सतीची चाल या सामाजिक रुढी परंपरांच्या विरुद्ध ताराबाई शिंदे यांनी आपली लेखणी चालवलेली आहे. प्रस्तावनेतच ताराबाई विधवा पुनर्विवाहाचे समर्थन करतात. घराण्यांची प्रतिष्ठा ही पुनर्विवाह होण्यावरच कमी होत असेल तर त्या जाती, धर्म व घराण्यांमध्ये पुरुषांचेसुद्धा पुनर्विवाह होता कामा नयेत असे त्या लिहितात. विधवा स्त्री व विधूर यांना पुनर्विवाहाची समान संधी असली पाहिजे. केवळ पुरुषांनाच पुनर्विवाहात परवानगी देणे म्हणजे समाजाचा अत्यंतिक दुटप्पीपणा आहे असे त्यांनी नमूद केले आहे.

भारतामध्ये ब्राह्मण ही वरिष्ठ जात समजली जाते. या जातीमध्ये पुनर्विवाहाला बंदी असल्यामुळे त्याचेच अनुकरण अनेक कनिष्ठ जातींनीही स्विकारले असल्यामुळे अनेक जातीत विधवा पुनर्विवाहावर बंदी निर्माण झाल्याने तत्कालीन समाजातील विधवा स्त्रियांची कुचंबणा होत असल्याची वस्तुस्थितीत ताराबाई शिंदे यांनी चित्रित केलेली आहे.

“तसेच पुनर्विवाह ब्राह्मणातच होत नाहीत असे काही नाही. दुसऱ्या अवांतर पुष्कळ परभू, शेवणी, गुजराथी, भाटे, मारवाडी, मऱ्हाठे, देसाई, देशमुख, इनामदार, जहागिरदार, शिरके, महाडिक, जाधव, भोसले, माने असे अनेक आडनावाचे सोलापूर, सातारा, पुणे, ग्वाल्हेर, इंदूर या प्रांती असे जे मराठे मऱ्हाठशाहीला मानतात, त्या त्यांचे कुळात तर ब्राह्मणापेक्षाही पुनर्विवाह न होण्याची सक्ती दिसून येते. या लोकांचे घराण्यात तर प्राणंती असे होणार नाही. अशा उठून गेल्या तर जाऊ देतील, पण पुन्हा दुसरा नवरा कधीच करू देणार नाहीत.”[१]

अनुकरण हा मानवी गुणधर्म आहे. भारतात ब्रिटिशांच्या आगमनानंतर अनेक क्षेत्रात भारतीयांनी आधुनिकीकरण व पाश्चात्यीकरण स्विकारले. मात्र समाज, धर्म व पुरुषांना सोयीच्याच बाबी अंगिकारल्या आणि स्त्रियांना कायम बंधनात, रुढी-परंपरेमध्ये बंदिस्त केले. पुरुषांचे पेहराव, केशभूषा बदलल्या. घरातील भौतिक साधने बदलली पण विवाहाच्या कुटुंबातील कामकाजाच्या, हक्क व अधिकारांच्या बाबतीत विषमता कायम राहिल्या व पाश्चात्यांचे अंधानुकरण करण्यामुळे स्वदेशी रोजगार बुडून सर्व प्रकारचे व्यापारी, कारागीर लोक उपाशी मरू लागले असल्याचे चित्र ताराबाईंनी वर्णन केले आहे. यावरून ताराबाईंचा स्वदेशाभिमान व राष्ट्रवादी बाणाही दिसून येतो.

संत जनाबाई प्रमाणेच ताराबाई शिंदे यांना आपण स्त्री असल्याचा अभिमान आहे. मी स्त्री



असल्यामुळे स्त्री जातीवर होणारा अन्याय-अत्याचाराविरुद्ध खडखडीत लिहिणे व त्यांच्या कल्याणार्थ कार्य करणे ताराबाई महत्त्वाचे मानतात. आधुनिक काळात सत्तेत असणाऱ्या, सुस्थितीत किंवा उच्चपदस्थ महिलांनी स्त्री जातीचा अभिमान बाळगून इतर स्त्रियांच्या कल्याणार्थ आपली लेखणी, बुद्धी झिजवणे हा आदर्श स्विकारायला हवा. ताराबाई पुढे असेही लिहितात की या लिखाणाचा फार सकारात्मक पणिाम होण्यापूर्वीच सर्व पुरुष एकत्र येऊन माझे विचार धुळीस मिळवतील कारण स्त्रियांचे दुःख, स्त्रियांचे प्रश्न हे पुरुषांचे कधीच होत नाहीत. कारण ते राजकारणाचे, राज्यकर्त्यांचे प्रश्न नसतात. या देशात त्याच प्रश्नांची उत्तरे शोधली जातात ज्यामुळे सत्ता मिळते, सत्ता टिकवून ठेवता येते. अन्यथा त्याकाळी व आजही स्त्रियांच्या प्रश्नांवर वर्तमानपत्रात भरभरून बातम्या असतात. पण ते प्रश्न पुरुष व राजकारणाच्या विचार विश्वाबाहेरची असतात.

विधवा पुनर्विवाहाचे समर्थन करताना ताराबाई लिहितात - मनोनिग्रह करून मनुष्य वस्तीत राहून स्त्री-धर्म रक्षण होणेच नाही. मनाने व नेत्राने तरी त्या दोषाला पात्र होतातच. केवळ केशवपन केले, कुंकू पुसले तरी स्त्री म्हणून असलेले शरीरधर्म, नैसर्गिक भाव-भावना यांचा विचार समाज का करीत नाही असा प्रश्न ताराबाई विचारतात. एखाद्या कुटुंबात स्त्रियांचे अस्तित्त्व नसेल तर जो रखरखीतपणा येतो तो कुटुंबात पुरुष नसतानाही येईलच ना असेही त्या लिहितात. स्त्रियांच्या दुःखाची कारणे शारीरिक व सांपत्तिक स्थितीवरच अवलंबून नसतात तर त्यांना आत्मसन्मानही महत्त्वाचा वाटत असतो असे ताराबाई लिहितात. केवळ स्त्रीधर्माच्या किंवा पतिव्रताचा बडगा दाखवून सक्तीने सेवा व कनिष्ठ दर्जाची कामे आयुष्यभर स्त्रियांकडून करून घेणे कुठल्याही माणसास शोभा देत नाही असेही त्या म्हणतात. स्त्री प्रतिष्ठेला मानणाऱ्या ताराबाई धर्माने जे आदर्श स्त्रियांसमोर ठेवले आहे ते कसे थोतांड आहे हे सिद्ध करतात. हिंदू धर्मात पाच पतिव्रता म्हणून कुंती, सत्यवती, तारा, अहिल्या, द्रौपदीची उदाहरणे दिली जातात. मात्र याचे निकष कसे चुकीचे व पुरुषप्रधानतेला अनुकूल आहेत हे ताराबाई सांगतात. पतीच्या इच्छेसाठी सीतेला सवत बनविण्यासाठी अनुनय करणारी मंदोदरी (रावणाची पत्नी) पतिव्रता ठरू शकत नाही कारण ती सीतेच्या एकनिष्ठतेला बाधा आणित आहे. दिराची पत्नी होणारी तारा, तसेच कुंती व सत्यवतीच्या पतिव्रतेवरही ताराबाई टिका करतात. यावरून त्या असेही म्हणतात, स्त्रियांचे चारित्र्य, पतिव्रतत्त्व केवळ शरीराशी संबंधित असता कामा नये. रामाने ताराला बालीशी विवाहाची परवानगी दिली व पतिव्रता होण्याचा आशीर्वाद दिला तेव्हा ताराबाई शिंदे लिहितात चारित्र्याचे प्रमाणपत्र देव किंवा धर्मग्रंथ कशी काय देऊ शकतात? त्यापुढे असेही लिहितात गाढवाच्या पोटी जन्मास आलेले गर्दभऋषी, गायीच्या पोटी जन्मास आलेले

वृषभऋषी, हरिणीचे पोटी जन्मास आलेले भारद्वाज हे माणसांसाठी कायदे का बनवतात. कारण ते पशुच्या पोटी जन्मास आले आहेत. त्यांना माणसांसाठी का हवे, नको याचे नियम व कायदे बनविण्याचा अधिकार नाही. आजही ही बाब लागू केली जाते. शेती न करणारी माणसेच शेतीचे कायदे बनवितात. कायदे त्यांनीच निर्माण केले पाहिजे जे त्या समाजाचे घटक असतात किंवा त्या गोष्टीशी संबंधित असतात. मनुस्मृतीपासूनच स्त्रियांसाठी कायदे पुरुषांनी निर्माण केले. इतिहासही पुरुषांनीच लिहिल्यामुळे स्त्रियांचे आजपर्यंतचे सांस्कृतिक, सामाजिक, पर्यावरणीय विकास व पटलावरील योगदान व श्रेय स्त्रियांना दिले नाही, मान्यही केले जात नाही.

ताराबाई शिंदे या ग्रंथात पुरुषांना आव्हान देतात, तुम्ही सिंहासारखे धैर्यवान, भगीरथासारखे महाप्रयत्नी, निधडे, धैर्यशाली आहात. अग्नी, वीज, वायू या सर्वांना आपल्या अंकित केले मात्र तुम्ही विषयांच्या कपाळावर मळवट भरू शकत नाही. विधवेला सौभाग्यशाली बनविणे खरच एवढ कठीण काम आहे का? तुम्ही केवळ चर्चाच करू शकता. समस्येवर तुम्हाला उत्तर शोधायचे नाही. उलटपक्षी अशा स्त्रियांना नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले जातात. स्त्रियांना मोक्ष मिळविण्यातला मोठा अडसर मानले जाते. आपल्या प्राणांपेक्षा स्त्रिया पुरुषांना जपतात मात्र पुरुष नाना तऱ्हेने त्यांना गुलाम बनवितात, त्यांच्यावर आरोप करतात. स्वतःच्या अनारोग्य, इतर अपघात, मृत्यू यासाठी स्त्रियांना दोषी ठरविले जाते, अपशकुनी ठरविले जाते. हे सर्व दोष केवळ स्त्री म्हणून जन्माला आल्यामुळेच उद्‌भवतात का? पुरुष सर्वस्वी निर्दोष कसे काय असू शकतात असाही प्रश्न ताराबाई विचारतात. 'भूतदया' हेच खरे मानवी मूल्य आहे तेव्हा सर्व पुरुषांनी सामाजिक विकास घडवून आणण्यासाठी सद्‌सद्‌विवेकाचा वापर केला पाहिजे अन्यथा स्त्रिया केवळ भितीने त्यांच्यासोबत असल्याचे भासवतील पण अंतःकरणातून त्या पुरुषांचा तिरस्कारच करतील.

या छोट्या ग्रंथात ताराबाई शिंदेनी पुरुषांबरोबच ईश्वरालाही काही जाब विचारलेला आहे. ईश्वरही पुरुष असल्या कारणाने स्त्रियांना सर्वत्र बंदिस्त, गुलाम करून ठेवले आहे आणि पुरुषांना मात्र सर्वत्र मुक्त ठेवले आहे.

ताराबाई शिंदे यांचा 'स्त्री-पुरुषः तुलना' हा ग्रंथ आणखी वेगळ्या कारणाने अद्वितीय आहे कारण ताराबाई लिहितात मुलींना विवाहाचा जोडीदार निवडीचे स्वातंत्र्य दिले पाहिजे अन्यथा ती मुलगी जन्मभर दुःखी राहिल. केवळ मुलगी म्हणून वडिलांनी केलेले कौतुक आयुष्यभर सुखाचा मार्ग नाही तर तिला योग्य वेळी योग्य वर निवडण्याचे स्वातंत्र्य दिले पाहिजे असा आग्रह ताराबाईंनी धरलेला आहे. ताराबाई शिंदे यांनी हे केवळ लिहिले नाही तर त्याचे वैयक्तिक आयुष्यही

बंडखोरी आणि विद्रोहाने तेजस्वी बनलेले होते. त्यांनी गोषापद्धती नाकारलेली होती. त्या शिक्षित होत्या. त्यांना मराठी, हिंदी, संस्कृत, इंग्रजी भाषा अवगत होत्या. त्यांना वाचनाचा व्यासंगही होता. त्या काळातील विविध साहित्यप्रकार त्यांनी वाचल्याचे या ग्रंथात जागोजागी पुरावे मिळतात. मुक्तमाला, मंजुघोष, स्त्री चरित्र, विद्वध, स्त्रीचरित्र, मनोरमा इत्यादी पुस्तकातील स्त्रियांची पात्रे अभ्यासून त्यांचे विश्लेषण व प्रतिउत्तरे केल्याचे संदर्भही या ग्रंथात आढळून येतात. स्त्रियांना विशेषतः विधवा स्त्रियांना सर्व अधिकार नाकारणे अमानवी आहे. तिचा काहीही गुन्हा किंवा दोष नसताना तिला एकाकी आयुष्य जगावयास लावणे हे चुकीचे आहे. हे या ग्रंथातून ताराबाई वारंवार निदर्शनास आणतात. पुरुषांमधील बहुपत्नीत्वावरही त्या ताशेरे ओढतात. या ग्रंथ लेखनाचा उद्देश स्त्री-पुरुषांचा विचार समपातळीवर व्हावा. स्त्रियांना देवत्व किंवा दासीत्व न देता तिला माणूस म्हणून समजून घ्यावे, तिला अनुकूल जगण्याची संधी उपलब्ध करून देणेच खरे पुरुषत्व आहे असेही ताराबाई लिहितात.

स्त्रियांच्या अधोगतीस किंवा दुःखास ईश्वर किंवा निसर्ग कारणीभूत नसून पुरुषच कारणीभूत आहेत. तेव्हा पुरुषच एकत्र येऊन, आत्मपरिक्षण करून तिला मुक्त करू शकतात. असा आशावादही त्या व्यक्त करतात. ताराबाईंनी आपल्या अनुभवातून व निरिक्षण शक्तीतून अनेक उदाहरणे दिली आहेत. ती उदाहरणे कीर्तन, प्रवचन, कथा-श्रवणाने स्त्रियांच्या परिचयाची अशी आहेत. अल्प अक्षरात त्यांनी महत्त्वपूर्ण आशय व विचार मांडलेले आहेत. पुरुष आणि स्त्रिया यांच्यातील जीवशास्त्रीय भेद मान्य करताना त्यांच्यातील मानसिक, भावनिक, साम्य लक्षात घेतले पाहिजे, असाही महत्त्वपूर्ण विचार ताराबाईंनी या ग्रंथात दिलेला आहे. त्यांनी सतीप्रथेविरुद्धही बंड उभारले आहे. व्याभिचारी स्त्रियांनाच केवळ दोषी न ठरवता पुरुषालाही दोष दिला पाहिजे, त्याच्यावर सामाजिक बहिष्कार घातला पाहिजे असे त्या सुचवतात म्हणजेच त्यांनी कायद्यासमोरील समानतेचे तत्त्व याचे बीजच या ग्रंथात रोवल्याचे दिसते.

सिमोन दी बोव्हा यांनी 'द सेकंड सेक्स' लिहिण्यापूर्वीच ताराबाईंनी स्त्रियांच्या दास्यमुक्तीचा जाहीरनामा 'स्त्री-पुरुष : तुलना' या ग्रंथात मांडला होता. ताराबाई शिंदे यांनी समाजातील सर्व पुरुषांना भिष्माचार्यांसारखा संकल्प किंवा वृत्त घेवून विवेकी होण्याचे आवाहन केले होते. त्याचप्रमाणे सुसंस्कृत समाजाचे घटक म्हणून पुरुषांनी आपल्या कामवासनांवरीत नियंत्रण प्राप्त करण्याची आवश्यकतही विषद केली होती. समाजातील बहुसंख्य पुरुष सदाचार व नैतिकतेचे पाईक बनले तर त्या समाजातील स्त्रीयांना स्वतःचे चारित्र्य संवर्धन करणे सुलभ होईल व यामुळे एकूणच समाजामध्ये सुख व आनंद निर्माण होण्याची शक्यताही ताराबाई शिंदे यांनी वर्णिलेली आहे.

ताराबाई शिंदे स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार करीत असल्या तरी स्वैराचारास मात्र त्या परवानगी देत नाहीत. यामुळेच ताराबाई शिंदे या स्त्रीवादी विचारवंत व मानवतावादी विचारवंत म्हणून मान्यता पावलेल्या आहेत.

निष्कर्ष :

१. ताराबाई शिंदे यांनी पुरुष वर्चस्ववादाची भारतीय समाजव्यवस्थेच्या संदर्भात चिकित्सा केली आहे.
२. म. फुले व डॉ. आंबेडकर यांच्यापूर्वी ताराबाई शिंदेनी स्त्रीवादी दृष्टिकोनातून धर्म चिकित केली आहे.
३. स्त्रीयांच्या दुय्यमत्वास व शोषणास महाराष्ट्रातील धर्म व ग्रंथ प्रामाण्यवाद ही कारणे ताराबाईंनी स्त्री-पुरुष तुलनामध्ये नमूद केलेली आहेत.
४. स्त्री-पुरुष तुलनेच्या माध्यमातून ताराबाईंनी स्त्रियांना आत्मभान व पुरुषांना पुरुषभानासमवेत समाजभान निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.
५. महाराष्ट्रातील तत्कालीन परिस्थितीचा सखोल अभ्यास करून बुद्धीप्रामाण्यवादासाठी ताराबाई शिंदेनी नवा पायंडा पाडला आहे.

- प्रा. शेलजा बरुरे
स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय, अंबाजोगाई
संपर्क : ९४२३७ १४५३४

## गझल

### गुन्हाच केला .....

सभ्यपणाने जगावयाचा गुन्हाच केला
सरळपणाने चालायचा गुन्हाच केला

शालीनतेला ते माझ्या हो 'भिती' म्हणाले
विनम्र थोडे असावयाचा गुन्हाच केला

आयुष्याला सुंदरतेचे साज चढविले
कुरुपतेला लपवायचा गुन्हाच केला

सहज म्हणून मी माणुसकीचे केले दर्शन
मने जगाची जपावयाचा गुन्हाच केला

आकांक्षाच्या सौंदर्याला नजर लागली
स्वप्ने सुंदर पहावयाचा गुन्हाच केला

भलेपणाने शत्रूत्वाला दिले आमंत्रण
मदत कुणाला करावयाचा गुन्हाच केला

निष्ठेचेही होवून बसले इथले वावडे
सत्यावरती विसंबायचा गुन्हाच केला

- डॉ. सुनंदा शेळके, जयसिंगपूर

# ....आणि कविता जिवंत राहिली

- नितीन चंदनशिवे

तो दिवस आम्हा नवरा बायकोच्या आयुष्यातला सर्वात सुंदर दिवस होता. ती गरोदर होती. सातवा महिना सुरू होता. निर्भय तिच्या पोटात वाढत होता. माझा तीन महिन्यापासून पगार झाला नव्हता. मी कंत्राटी कामगार होतो आणि वेळ अशी आली होती. घरातलं सगळं राशन संपलं होतं. गॅस संपून आठ दिवस झाले होते. स्टोव्हमध्ये शिल्लक राहिलेल्या रॉकेलवर ती काटकसर करून कसातरी दोन वेळचा स्वयंपाक करत होती. टीव्हीचा रिचार्ज संपला होता. त्यामुळे टीव्हीही बंद होता. रोजचं येणारं दुध बंद केलं होतं. घरमालक सारखा भाडे मागण्यासाठी फोन करत होता. तीन महिने मी काहीतरी करून ढकलत आणले होते. तिच्या सोनाग्राफीला आणि दवाखान्याला बराच खर्च झाला होता. गावाकडे आईवडिल आणि बहीण असायचे. तिकडेही लक्ष द्यावे लागायचे. दिपालीने कधीच कसला हट्ट केला नाही. उलट जितकी काटकसर करता येईल तेवढी ती करत होती आणि माझ्यासोबत लढत होती. परंतु आजची परिस्थितीच भयंकर होती. घरात थोडेसे तांदूळ शिल्लक राहिले होते. बाकीचे सगळे डब्बे रिकामे झाले होते. एका वेळची सोय होणार होती. आणि मी माझ्या सगळ्या मित्रांना फोन करत होतो. पण माझा फोन कुणीच उचलत नव्हतं. कारण त्यांना माहित होतं हा पैसे मागायलाच फोन करतोय. सगळ्यांकडून उसने घेऊन झाले होते. त्यांचीही परिस्थिती काही वेगळी नव्हती. एकान फोन उचलला आणि मी बोलायच्या आधीच तो म्हणाला, “नितीन थोडेफार पैसे असले तर दे ना,” मी काहीच उत्तर दिलं नाही. फोन कट केला आणि कुणालाच फोन करून काही होणार नाही, आपल्यालाच काहीतरी करावं लागेल असा मनात विचार करून मी खाली अंथरलेल्या चटईवर बसलो.

तिची आंघोळ झाली होती. आम्ही पुण्यात पिंपळे निलख येथे भाड्याच्या रुममध्ये राहत होतो. टीव्ही बंद असल्यामुळे तिला करमत नव्हते. तिचा मूड ठीक करण्यासाठी मी कधीतरी तिच्या आवडीच ‘सुन्या सुन्या मैफलीत माझ्या तुझेच मी गीत गात आहे’ हे गाणं गुणगुणत असायचो. मी गाण गायला सुरुवात केली, पण ती एकटक

खाली मान घालून चटईवर बोट फिरवत होती. तिने लक्षच दिलं नाही. माझ्या कवितेवर ती फार प्रेम करते म्हणून कवितेच्या ओळी म्हणायला सुरुवात केली तेव्हा तिने झटकन माझ्याकडे रागाने पाहिलं. मी मान खाली घातली. घराच्या उंबऱ्यावर भूक हंबरडा फोडायला लागली की घराच्या आत जगातलं कोणतच संगीत आणि कोणतीच कविता मनाला आनंद देऊ शकत नाही हे कळलं.

आम्ही बराच वेळ एकमेकांशी काहीच बोललो नाही. ती मान खाली घालून चटईवर बोटाने कोणती न उमटणारी अक्षरे गिरवत कुणास ठावूक! सात महिन्याची गरोदर असणारी, एक नवा जन्म पोटात वाढवू पाहणारी, आई होण्याच्या उंबरठ्यावर असणारी दिपाली आमच्या बाळासाठी कदाचित एखादं नाव पुन्हा पुन्हा गिरवत असावी. मी तिच्या बोटाकडे एकटक पाहत होतो. ती स्वतःला सावरत हळूहळू उठली आणि दार उघडून बाहेर गेली. मी काहीच बोललो नाही. तिने शेजारच्या घरातून पेपर वाचण्यासाठी मागून आणला. कारण घरातली सगळी रद्दी या आठवड्यात तिने वाचून संपविली होती. रविवार होता, पेपरला पुरवण्या होत्या. तिचा चेहरा थोडासा खुलला आणि ती पुन्हा खाली बसली.




(प्रतिकात्मक छायाचित्र)

मी एकटक तिच्या डोळ्यात पाहत होतो. आणि ती पेपरची पाने चाळू लागली. आणि अचानक ती जोरात ओरडली, “ओ चंदनशिवे, हे बघा काय आलयं पेपरला.” मी म्हणलं, “काय दिपाली?” तर तिने मला विचारलं, “काय ओ चंदनशिवे तुम्ही कवी आहात ना?” मी पार गळून गेलेल्या आवाजात म्हणलं, “हो आहे पण काय करणार कवी असून आणि कविता तरी काय करणार आहे माझी?” तिने हाताला गच्च धरून जवळ ओढलं आणि माझ्या समोर ते पेपरचं पान धरलं. आणि त्या पानावर असलेली जाहिरात मला आजही आठवतेय. ‘अंशुल क्रिएशन प्रस्तुत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य राज्यस्तरीय खुली काव्यवाचन स्पर्धा’ रोख रकमेची तीन बक्षिसे. खाली पत्ता होता चिंचवड, पुणे आणि संपर्क साधा म्हणून मोबाईल नंबर दिलेला होता. मी ती जाहिरात बघितली. दिलेल्या नंबरवर फोन केला. नाव सांगितलं. नाव नोंदणी केली. आणि मी दिपालीकडे बघितलं तर तिच्या डोळ्यात एक वेगळीच चमक मला दिसायला लागली होती. ती म्हणाली, “चंदनशिवे घरात शेवटचे सत्तर रुपये आहेत. ते मी तुम्हाला देतेय. या स्पर्धेत जा. आजच स्पर्धा आहे ही. तिथं कविता म्हणा, आणि त्यातलं सगळ्यात मोठी रक्कम असणारं बक्षिस घेऊनच घरी या. पण एक सांगते आज, जर तुम्ही बक्षीस नाही मिळवलं तर संध्याकाळी या घरात फक्त नितीन चंदनशिवे आत येईल. कवी नितीन चंदनशिवे पुन्हा या जगात कुठ दिसला नाही पाहिजे.” तिच्या या वाक्याने माझ्या पोटातलं काळीजच कुणीतरी मुठीत गच्च आवळून धरल्यागत वाटायला लागलं.

ती पुढे म्हणाली, “जर माझ्या संसाराला तुमची कविता राशन मिळवून देऊ शकत नसेल तर ती कविता मला या घरात नकोय.” सात महिन्याची गरोदर असणारी, सर्वसामान्य गृहिणीसारखी सुखी संसाराची स्वप्न पाहणाऱ्या दिपालीचं त्यावेळी काही चुकलं असेल असं मला अजिबात वाटत नाही. मी ते तिचं आवाहन स्विकारलं. तिने घरातले जपून ठेवलेले सत्तर रुपये माझ्या हातात देताना माझा हात घट्ट आवळून धरला आणि मला आतल्या आत हुंदका आला. मी अंगात कपडे घातले. तिच्या डोळ्यात बघितलं आणि निघालो.

मी चिंचवडला आलो. बसच्या तिकीटाला दहा रुपये गेले होते. तिथं प्रवेशफी पन्नास रुपये होती. ती भरली. ती भरत असताना माझ्या मनाच्या वेदना नाही मांडता येणार. परत जाण्यासाठी दहा रुपये शिल्लक राहिले होते. मी ते जपून ठेवले. बाजूला सर्वांसाठी नाष्ट्याची सोय केली होती. मला खावंसं वाटलं नाही. कारण ती घरात उपाशी होती. मी मनातल्या मनात हादरून गेलो होतो. मी स्पर्धेला आलो होतो खरा पण आतल्या

आत माझ्या कवितेची माझ्या पत्नीशी स्पर्धा सुरू झालेली होती. कारण इथं जिंकलो तरच माझ्या अंतरंगात कविता आयुष्यभर जीवंत राहणार होती आणि हरला तर फक्त शरीर घेऊन मेलेल्या मड्यागत जगणं समोर दिसत होतं.

स्पर्धा सुरू झाली. बराच वेळ होत चालला होतो. इतरांच्या कविता मला ऐकूच येत नव्हत्या. कारण डोळ्यासमोर फक्त माझी गरोदर असणारी बायको दिसत होती आणि उपाशी पोटाने तिने मला मारलेली 'ओ चंदनशिवे' ही हाक ऐकू येत होती.

माझं नाव पुकारलं गेलं. मी स्टेजवर जायला निघालो. तेव्हा मी आयुष्यातला फार मोठा जुगार खेळायला चाललो होतो आणि डावावर कविता लावली होती. अन् तेवढ्यात पायऱ्या चढून वर जाताना, स्टेजवर बाबासाहेबांचा आणि रमाईचा एकत्र असलेला फोटो दिसला. अंगावर काटा आला. अंग थरथर कापलं. वीज चमकावी तसं मेंदूत काहीतरी झालं. रमाईला आणि बाबासाहेबांना डोळे भरून बघून घेताना अंगात बळ येत गेलं. इतकं बळ आलं की त्या क्षणाला मी जगातली कुठलीही स्पर्धा जिंकू शकत होतो. माझी 'तमाशा' नावाची कविता बेंबीच्या देठातून साद केली. कविता संपली. टाळ्या कानावर यायला लागल्या. त्याच  टाळ्यांया आवाजात पुन्हा येऊन जाग्यावर बसलो आणि पुन्हा डोळ्यासमोर संसार दिसू लागला.

स्पर्धा संपली. पारितोषिक वितरण समारंभ सुरू झाले. त्यावेळी सामाजिक न्यायमंत्री राजकुमार बडोले यांच्या हस्ते पारितोषिक वितरण होणार होतं. मंचावर ते उपस्थित होते. सूत्रसंचालकाने विजेत्यांची नावे जाहीर करण्यासाठी माईक हातात घेतला आणि छातीत धडधड सुरू झाली. त्याने सर्वात आधी तृतीय क्रमांक पुकारला. टाळ्या सुरू झाल्या. तो तीन नंबरचा विजेता स्टेजवर गेला. त्याच्या हातात ट्रॉफी, गळ्यात शाल, पुष्पगुच्छ व ते पांढऱ्या रंगाचं पाकीट राजकुमार बडोले यांनी दिलं. त्याला तिथेच थांबवला. माझी नजर त्याच्या पांढऱ्या पाकिटावरून हटत नव्हती. सूत्रसंचालकाने दुसरा नंबर घोषित केला. माझं नाव नव्हतं. पोटात अजून गोळा आला. तो विजेता ही तसाच जाऊन स्टेजवर थांबला. आणि आता सूत्रसंचालक प्रथम क्रमांक घोषित करणार होता. मी डोळे गच्च मिटून घेतले. पोटात कळ यायला लागली होती. छातीत धडधड वाढलेली होती. दोन डोळ्यांच्या बंद पापणीच्या आड फक्त गरोदर असणारी माझी पत्नी माझी वाट बघत असलेली दिसत होती आणि कानावर आवाज आला, "आणि या स्पर्धेचा प्रथम क्रमांकाचा विजेता आहे, ज्याने तमाशा कविता सादर केली असा नितीन चंदनशिवे." टाळ्यांचा प्रचंड कडकडाट होत होता. बंद पापणीच्या आतून डोळ्यांनी बांध

सोडला आणि गालावर पाणी घळघळ वाहायला लागलं. सगळ्या जगाला मोठ्याने ओरडून सांगावं वाटत होतं मी आयुष्यभर कविता लिहिणा आहे. होय मी कवी म्हणून जीवंत राहणार आहे.

टाळ्या थांबत नव्हत्या. आतल्या आत हुंदके देत मी स्टेजवर गेलो. बाजूच्या विंगेतून साडी नेसलेली मुलगी हातात ट्रे घेऊन येताना दिसू लागली. मी प्रमुख पाहुण्यांच्या समोर अंतर राखून उभा राहिलो होतो. फोटोवाला फोटो घेण्यासाठी कॅमेरा डोळ्याला लावून तयार झाला होता. मी खिशातला मोबाईल काढला आणि दिपालीला फोन केला. पहिल्या रिंगमध्ये फोन उचलला आणि म्हणाली, “चंदनशिवे काय झालं सांगा ना लवकर” ती बिचारी वेड्यासारखं हातात फोन धरून माझ्या फोनची वाट बघत बसली होती. मी फोन कानाला दाबून गच्च धरला आणि म्हणलं, “दिपाली पहिला नंबर आलाय.” मला एक अपेक्षा होती तिने अभिनंदन वगैरे म्हणावं अशी. पण ती तसलं काही बोलली नाही. ती पटकन म्हणाली, “ते पहिला नंबर आलाय ठीक आहे पण रक्कम किती आहे ते सांगा आधी.” आणि तेवढ्यात ती मुलगी ट्रे घेऊन जवळ आली. ती प्रमुख पाहुण्यांच्या हातात ट्रे देत होती. इकडं कानाजवळ दिपाली फोनवरून रक्कम विचारत होती. माझ्या डोळ्यासमोर फक्त पांढरं पाकीट दिसू लागलं. मी कसलाच विचार केला नाही. ते पाकीट मी हिसकावून हातात घेतलं. सगळेजण तोंडाकडे बघत होते. मला काहीच वाटत नव्हतं. मी स्टेजवर ते पाकीट फोडलं. दोन बोटं आत घालून त्या नोटा मोजल्या. त्या पाचशे रुपयांच्या दहा नोटा होत्या. आणि मी फोन कानाला लावून म्हणलं, “दिपाली, पाच हजार रुपये आहेत.” हे वाक्य बोलताना घळकन डोळ्यातून एक धार जोरात वाहिली. त्यावर दिपाली काहीच बोलली नाही. तिचा एक बारीक हुंदका मात्र ऐकू आला. आणि जवळ जवळ पंचवीस सेकंद आम्ही एकमेकांशी काही बोललो नाही. फक्त दोघांचे श्वास आम्ही अनुभवत होतो. मला वाटतं आम्ही दोघेजण किती जगू माहित नाही, पण आयुष्यातला तो पंचवीस सेकंदाचा काळ हा सुवर्णकाळ वाटतो मला. आम्ही नवरा बायकोने त्या पंचवीस सेकंदाच्या काळात आमचं जन्मोजन्मीचं नातं मुक्याने समजून घेतलं. नंतर हातात ती ट्रॉफी आली. गळ्यात शाल पडली. फुलांचा तो गुच्छ घेतला. आणि मी तिथून कसलाही विचार न करता निघालोसुद्धा. त्या फोटोवाल्याला हवी तशी पोझ मिळालीच नाही. आणि माझ्या त्या वागण्याने सगळेजण मला बावळट आहे की काय अशा नजरेने बघत होते. फोटोवाला ही रागानेच बघत होता. मी थेट गेटमधून पांढरं पाकीट खिशात कोंबून बाहेर पडलो.

घरी येताना तिच्यासाठी मिठाई घेतली. तिला समोसे आवडतात म्हणून गरमागरम समोसेही

घेतले. तिसऱ्या मजल्यावर आमचं घर होतं. मी अक्षरशः पायऱ्या तुडवत पळत पळत धापा टाकत दारात आलो. दार वाजवणार तेवढ्यात तिनचे दार उघडलं, आणि म्हणाली, "कवी नितीन चंदनशिवे यांचं माझ्या संसारात स्वागत आहे." हुंदका दाटून आला. मला स्पर्धा जिंकल्याचा, पाच हजार मिळाल्याचा आनंद नव्हताच. मी आयुष्यभर तिच्यासमोर ताठ मानेने कविता लिहिणार होतो. कवी म्हणून तिच्या नजरेत जगणार होतो. कवी म्हणून जिवंत राहणार होतो. याचा आनंदच नाही तर मी हा महोत्सव माझ्या काळजाच्या गाभाऱ्यात आतल्या आत साजरा करत होतो. तिने माझे पाणावलेले डोळे पुसले. तिच्यासाठी खायला आणलेलं तिच्या हातात दिलं. आम्ही दोघेही खायला बसलो. आणि ती म्हणाली, "चंदनशिवे आपल्याला ज मुलगा झाला तर आपण त्याचं नाव निर्भय ठेवायचं. कारण आज पोटात तो सारखं लाथा मारून मला त्रास देत होता. तो सोबतीला होता म्हणून मनात भितीच नव्हती. तुमचा फोन येणार आणि तुम्हीच जिंकलाय असं सांगणार असंच वाटत होतं."

सगळी मिठाई दोघांनी खाल्ली. तिने कागद आणि पेन घेतलं. आणि किराणा मालाची यादी लिहायला सुरुवात केली. तिने ती यादी लिहून झाल्यावर माझ्या हातात दिली आणि जा घेऊन या लवकर सामान अस म्हणून ती पिशवी घेण्यासाठी उठली.


आणि त्याच कागदाच्या मागील बाजूस मी कविता लिहिली. ती अशी .....

माझा महिन्याचा पगार होतो तेव्हा,
माझी बायको तिच्या सुंदर हस्ताक्षरात
किराणा मालाची यादी लिहिते,
ती यादीच
माझ्यासाठी जगातली
सर्वात सुंदर कविता असते....
आणि यादीची समीक्षा
फक्त आणि फक्त
तो दुकानदारच करत असतो
तो एक एक शब्द खोडत जातो
आणि कविता
तुकड्या तुकड्याने
पिशवीत भरत जातो
आयुष्यभर माहित नाही
पण कविता आम्हाला
महिनाभर पुरून उरते
कविता आम्हाला महिनाभर पुरून उरते

- नितीन चंदनशिवे
मु.पो. कवठे महांकाळ
जि. सांगली.
संपर्क : ७०२०९०९५२१

# कवी मनाचे आ. ह. साळुंखे

- दीपा देशमुख



महाराष्ट्रातले अभ्यासू पुरोगामी विचारवंत म्हणून आ. ह. साळुंखे ओळखले जातात. त्यांच्या कविता, त्यांची स्वकथनं, त्यांचं ललित लिखाण, त्यांचं बालसाहित्य, त्यांचं समीक्षात्मक लेखन आणि त्यांचं वैचारिक लेखन आज संपूर्ण महाराष्ट्राला नवा विचार देत आहे. त्यांच्या जगण्यावर चार्वाक, बुद्ध, महात्मा फुले, शाहू महाराज, बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेचा प्रभाव आहे. धर्म असो वा धर्मचिकित्सा, स्त्रियांचे प्रश्न असोत वा गुलामगिरीविषयीचं भाष्य, मनुस्मृतीबद्दलची आपली भूमिका असो वा चार्वाक, बुद्ध, फुले, शाहू महाराज यांच्या विचारांची केलेली मांडणी आ. हं. नी सतत आपल्या लिखाणातून समाजाला प्रगतीचा आधुनिकतेचा, विवेकाचा आणि सुजाण नागरिक बनण्याचा मार्ग दाखवला. आपल्या संस्कृतीचं दर्शन घडवत असतानाच त्यांनी या समाजाला त्यावर विचार करायला भाग पाडलं. आपलं संपूर्ण आयुष्य त्यांनी आपल्या लेखणीतून समाज प्रबोधनाचं कार्य हाती घेतलं. आ. ह. साळुंखे यांनी वेदांचा अभ्यास केला. त्यासाठी त्यांनी संस्कृत भाषेचं अध्ययन केलं. त्यांनी पाली भाषा आत्मसात केली कारण त्यांना बुद्धाच कार्य आणि बुद्धाची शिकवण शिकायची होती. याच वेळी त्यांना रविंद्रनाथ टागोरांच्या शांतिनिकेतनमध्ये जाऊन आणखी शिकावं अशी तीव्र इच्छा त्यांच्या मनात निर्माण झाली होती. काही कारणानं ते शक्य झालं नाही, पण त्यांनी टागोरांच्या ‘गीतांजली’ची अक्षरशः पारायणं केली. संस्कृत, पाली बरोबरच त्यांनी मग बंगाली भाषाही आत्मसात केली.

आपल्या सगळ्या लिखाणातून आ.हं.नी अतिशय सौम्यपणे तरीही स्पष्ट भूमिका घेत आपल्या विचारांची मांडणी केली. त्यांनी आपल्या मूल्याशी कधीही तडजोड केली नाही. मात्र त्यांचं

स्वतःचं व्यक्तिमत्व इतकं ऋजू आणि हळूवार आहे की त्यांनी आपल्या लिखाणातून स्पष्टपणे आपले विचार जरी मांडले असले तरी त्यांनी कधी कुणाला दुखावलंही नाही आणि म्हणूनच त्यांचं लिखाण वाचणाऱ्या, त्यांना प्रत्यक्ष भेटणाऱ्या माणसांना ते आपलेसे वाटतात. प्रत्येक गोष्टीच्या मुळाशी जाणं आणि त्यातलं मर्म समजून घेणं हा आ.हं.च्या स्वभावातला एक विशेष पैलू अनुभवायला मिळतो. आज परिवर्तनवादी चळवळीतलं अग्रेसर नाव घ्यायचं झालं तर आ. हं.चंच नाव घ्यावं लागेल.

आ. ह. साळुंखे यांचं सर्वच प्रकारचं लिखाण वाचकांना आवडलं, वाचकांनी ते लिखाण आपलंस केलं, त्यावर अंतर्मुख होऊन विचार करायला सुरुवात केली आणि त्यानुसार आपल्या जगण्यातले बदल घडवण्यासाठी पावलं उचलली. याचं कारण आ.हं.च्या भाषेतला साधेपणा, समोरच्याच्या मनात उतरून त्याच्यापर्यंत आपले विचार पोहोचवण्याची जबरदस्त ताकद! आ.हं.च्या आयुष्यात जेव्हा कविता या प्रकारानं हळूच प्रवेश केला आणि समोर येईल त्या विषयाला सोबत घेऊन त्यांची कविता कागदावर उतरू लागली, तेव्हा त्यांच्या मनात येणाऱ्या प्रत्येक विषयांमधून कविता आपलं अस्तित्त्व दाखवू लागली. भारत-चीन युद्ध असो वा राष्ट्रप्रेम भरभरून कविता कागदावर उतरत गेल्या. याच वेळी प्रेमकवितांनीही आपला ठसा उमटवला. आ. हं. चा तारुण्यातला प्रवास खूपच अनोखा आहे. शरदचंद्र चटर्जींच्या देवदाससारख्या कादंबऱ्यांनीही त्यांच्यावर मोहिनी टाकली होती. मुकेश या गायकाची गाणी त्यांच्या हृदयाला कातर करून सोडत होती.



आ.हं.ची सखी, प्रेयसी आणि नंतर पत्नी म्हणून आयुष्यात आलेली मधुश्री हिला संस्कृत शिकवता शिकवता आ.ह. तिच्या प्रेमातच पडले. मधुश्रीचं आ.हं.च्या आयुष्यातलं असणं हे त्यांच्यासाठी स्फूर्तीदायी बनलं. त्यांच्यातल्या अफाट ऊर्जेला मधुश्रीमुळे चालना मिळाली. हे प्रेम इतकं उत्कट आणि अतूट होतं आणि आहे की मधुश्रीच्या आकस्मिक मृत्यूनंतरही ते तिच्यापासून क्षणभरही दूर होऊ शकले नाहीत. मधुश्रीचं असणं, मधुश्रीचं दूर जाणं, मधुश्रीच्या आठवणी, मधुश्रीचा सहवास हे सगळं सगळं व्यक्त होण्यासाठी मनात उसळी मारत होतं आणि मग प्रतीक्षा करत असलेली कविता पुन्हा एकदा सगळे बंध तोडून

धावतच त्यांच्याकडे आली आणि त्यातून आ.हं.चा ‘अशी भेटत रहा तू’ आणि ‘जीवनाची लय वेदनेत’ हे काव्यसंग्रह प्रकाशित झाले.

आ.हं.ची कविता सहज, सोपी, रसाळ आणि ओघवती आहे. ती त्यांचीच नव्हे तर समोरच्याची त्याच्याही नकळत होऊन जाते. ही कविता सोपी असली तरी तिच्यातली खोली, तिच्यात दडलेले अर्थ इतके सुलभ नाहीत. आ.हं.ची कविता आक्रमकतेची कास धरत नाही, तर ती सौम्यतेला जवळ करणारी आहे. आ.हं.ची कविता निराशेचा सूर काढते पण ती निराशेला कवटाळून बसत नाही. आ.हं.ची कविता दुःखाची भाषा बोलते पण दुःखाला ती आपल्यावर अतिक्रमण करू देत नाही. आ.हं.ची कविता मनस्वी आहे, पण ती त्यांना वाहवत जाऊ देत नाही.

करूणा हृदयी मस्तकी विवेक
याहून अधिक काय हवे?
आटू नये कधी झरा करूणेचा
दीप विवेकाचा विझू नये
बळ इतुके दे तुझ्या स्मृतीतून
मागणे याहून नाही दुजे

मधुश्रीच्या आपल्या पियतमेच्या जाण्यानं देखील आ.ह. सावरले. त्यांच्यातल्या विवेकानं त्यांना आजपर्यंत साथ दिली. मात्र मनातल्या करूणेनं त्यांच्या मनात कठोरतेचा प्रवेश होऊ दिला नाही. अर्थात, तरीही त्याचं श्रेय आ.ह. स्वतःकडे घेत नाहीत.

तिचं असणं आता आ.हं.च्या इतक्या सवयीचं झालयं की ते म्हणतात -

धड एक काम
करू देत नाहीस
सारख्या आपल्या येरझारा
आणि सुरू तोंडाची वटवट
क्षणभर सुद्धा
स्वस्थ बसू देत नाहीस
हे घ्या, ते घ्या
अशी चालू सारखी कटकट

यातले वटवट आणि कटकट हे शब्दही प्रेमच व्यक्त करतात. ती नाही हे ठाऊक असूनही ती तरीही तिचा वावर कसा त्यांच्या आसपास आहे, ती त्यांची काळजी कशी घेते आहे आणि सतत काहीतरी त्यांना सांगते आहे .... त्यामुळे काम करू देत नाही ही त्या प्रियकराची लाडिक तक्रार या कवितेतून व्यक्त होते आहे.

ती होती तेव्हाचं जगणं हे खरं जगणं होतं. या सगळ्या गोष्टीमध्ये ताजेपणा होता. एक प्रकारचा जिवंतपणा होता. आता मात्र जगणं हा एक उपचार बनून राहिलाय असा त्यांच्यातला विव्हल प्रियकर सांगतो -


तू सोबत होतीस
तेव्हाचे जगणे जिवंत होते
ते आतासारखे
जगण्याचे केवळ सोंग नव्हते .....

ती असताना रोज नवं सर्जन काही करण्यासाठी खुणावत रहायचं. ते सगळं जगणंच खूप उत्स्फूर्त होतं, उल्हसित करणारं होतं. आता केवळ एखाद्या यंत्रानं हालचाली करत रहाव्यात असं काहीसं जगणं झालंय अशी खंतही आ.हं.च्या मनातून बाहेर पडते.

कितीक जण चांगलं सांगत होते
सात जन्माची सोबत असते म्हणून
खरंही वाटत होतं
पण मध्येच या चार्वाकानं 'घात' केला
तसा तो आजही माझा जिवलग मित्रच
त्याचं ऐकून
पुनर्जन्मावरचा विश्वास
मी साफ धुडकावून लावला .....

कल्पनेत जगू पाहणाऱ्या आ.हं.मधल्या प्रियकराला आता ती नसली तरी साता जन्माची सोबतीण म्हणून लवकरच पुन्हा भेटेल अस स्वप्नरंजन सुरू होतं. मात्र त्यांच्या या स्वप्नरंजनात बिब्बा टाकण्याचं काम करण्यासाठी चार्वाक उभाच असतो. चार्वाक आपल्याला भेटला नसता तर आपण खोटं खोटं का होईना मनाचं समाधान केलं असतं असं ते म्हणतात. मात्र त्याचे वेळी सत्याचा प्रकाश दाखवणाऱ्या चार्वाकाची साथ त्यांना सोडवत नाही. तसचं आज आयुष्यात तुझ्या नसण्याचं दुःख आहे म्हणूनच तुझी आठवणही आहे असं त्यांना वाटतं. आनंदाचे क्षणही आहेत, पण ती सर आता त्यांना नाही.

एका तुझ्या जाण्यामुळे
सारी हरवली सृष्टी
आणि पाची इंद्रियांनी
माझ्या गमावली दृष्टी



तिचं आपल्या आयुष्यात नसणं किती भयाण आहे, हे सांगताना आ.हं.मधला कवी आपल्या सगळ्या संवेदना बधीर झाल्याची जाणीव व्यक्त करतो.

.... तू गेल्यापासून मात्र
मीच बनलो आहे मिथ्या
सापानं टाकलेल्या कातीसारखा
अस्तित्वाचा केवळ एक भ्रम ...

असं म्हणताना आ.हं.मधला कवी म्हणतो : तू खरच होतीस का? मात्र या प्रश्नाचं उत्तर लगेचच मिळतं. हो ती होतीच आणि मीही होतोच. ते सगळं स्वप्न नसून सत्यच होतं. मात्र आता मात्र आपणच मिथ्या बनलो आहोत असं त्यांना वाटायला लागतं. आपण तिच्यावर किती विसंबून होतो हे तिच्या नसण्यानं दाखवलय. एकट्यानं जगणं या गोष्टीचा आपण कधी विचारच केला नव्हता असं ते म्हणतात. इतकाच एक मोठा दिलासा आहे की तिच्या स्मृती मात्र सदैव सोबत करत राहतात. जगण्यात बहर नुकताच आलेला असताना मात्र तिचं अचानक निघून जाणं त्यांना असह्य करतं. मग ती आहे असं समजून ते तिच्याशी भांडतात, तिचीच तिच्याजवळ तक्रारही करतात आणि मग आपल्या मनातल्या आकांताला शांत करण्याचा प्रयत्न करत तिचीच माफीही मागतात.

सारा संताप संताप
राग काढू कुणावर?
फाडफाड बोलू कुणा
मन निवळाया पार?

आ.हं. मधला कवी म्हणतो : तू माझ्या इतक्या जवळ होतीस, तुझ्यावर इतका हक्क होता की माझा राग, माझा आनंद, माझं दुःख सारं काही व्यक्त होण्याची एकमेव जागा म्हणजे तूच होतीस. आता मी इतका एकटा पडलोय की तशी जागाच आता नाही. मी मनातलं हे गुज, मनातला हा कल्लोळ कोणाजवळही सांगू शकत नाही. मनातल्या या आक्रोशाला बाहेर पडायला आता जागाच नाही.

नाही आणली भारी मी
वस्त्रे आणि प्रावरणे
नाही तुझ्यासाठी केली
मौल्यवान आभूषणे
काय माझ्यापाशी होते
सारी शब्दांचीच दौलत
उधळली नाही तीही
होऊनिया मुक्तहस्त

आपल्या मनातली खंत कवी एका हुरहुरत्या क्षणी व्यक्त करतो. आपल्या जवळच्या व्यक्तीला इतकं गृहीत धरलेलं असतं की ती असताना तिच्यासाठी काही वेगळं करावं, तिला काही भेटवस्तू द्याव्यात असं मनातही येत नाही. भरजरी वा असो वा दागिणे आपण तिच्यासाठी काहीही आणलं नाही, ते कदाचित आणूही शकलो

नसतो, पण आपल्याजवळ शब्दाची संपत्ती होती. आपण आपल्या सखीसाठी मुक्तहस्तानं तिची देखील उधळण केली नाही. आपण हे सगळं ती असताना तिच्याजवळ व्यक्त करायला हवं होतं असं आ.हं. मधल्या कवीचं मन आक्रोश करत सांगतं.

अशी भेटत रहा तू
मला अधून मधून
पुन्हा पेटलाच वन्ही
ती जाईल विझून

असं मनाला सांगताना आ.ह. म्हणतात : तू आहेस माझ्याजवळ या एका भावनेनं मला शांत केलयं. तुझ्या वियोगानं मी दुःखी जरी झालो असलो तरी मी या रणभूमीवरून पळ काढलेला नाही. हा प्रवास मी तुझ्या स्मृतींना सोबत घेऊन करतच राहणार आहे.

वेदनेचा अविष्कार
देतो जगण्याचे बळ
ऊर्जा पुरवितो जीवा
पचविण्यास वादळ
अश्रू अनावर जेव्हा
वाहतात आपोआप
मन धुतल्यासारखे
होते निर्मळ निष्पाप

ही वेदनाच आपल्याला जगण्याचं बळ देतेय असंही हा कवी म्हणतो. अनेक प्रकारांनी तो आपल्या मनाची समजूत घालताना दिसतो. आपण आपलं दुःख जगापुढे मांडणं काही बरं नाही असंही कधी कधी त्याचं मन सांगतं. मात्र मनातल्या भावना आपोआप प्रवाही होत बाहेर पडतात. तसंच प्रत्येक गोष्टीतून त्याचं दुःख त्याला नैराश्याकडे नेत नाही. त्याच्यातला आशावाद, त्याच्यातली सकारात्मक वृत्ती त्याला पुन्हा पुन्हा चांगलं काही करण्याची प्रेरणा देत राहते. तिच्या आठवणी देखील त्याला तुझा प्रवास, तुझी वाट तू चालत रहा. तुझं जगणं कधीच तुझं एकट्याचं नव्हतं, तेव्हा ते इतरांसाठी अर्थपूर्ण करत चालत रहा असंच जणू काही सांगत राहतात.

कवी अनिल (आत्माराम रावजी देशपांडे) आणि इंदिरा संत यांच्या कवितांशीही काही समीक्षक आ.ह. साळुंखेंच्या कवितांची तुलना करताना आढळतात. या दोहोंच्या हृदयातील प्रेमभावना, तळमळ यात साम्य आहे. मात्र आ.हं.मधला कवी वाट्याला इतकं दुःख आलं तरी तो अध्यात्माकडे झुकताना दिसत नाही. त्यांच्या कवितांमधून चार्वाक, बुद्ध त्यांना सदोदित साथ करत राहतात. तसंच त्यांचा विवेकनिष्ठ आणि विज्ञानवादी दृष्टिकोनच त्यांना जगण्याचं अधिकाधिक बळ देत राहतो. त्यामुळेच आ.हं.ची कविता मधुश्रीची, ज्यांची आणि वाचणाऱ्या प्रत्येकाला ती त्याचीच असल्याची जाणीव करून देते हे विशेष! आ. हं.च्या कवितेला अलंकारिक भाषेचा

सोस नाही, ती साध्यासुध्या शब्दांनी खुलणारी आहे. तिला तिचा एक स्वतःचा नाद आहे, गेयता आहे आणि लय आहे.

खरं तर मधुश्रीया जाण्यानं आ.ह. दुःखात बुडाले होते. तिचा वियोग हा सहन होण्याजोगा नव्हता. अशा वेळी मात्र पुन्हा त्यांचा लाडका चार्वाकच त्यांच्या मदतीला धावून आला. 'कवितेला काही काळाकरता जरा बाजूला सार आणि थोडा कठोर होऊन वास्तवाकडे बघ' अशी जणू काही चार्वाकानं त्यांना आज्ञाच दिली. आणि म्हणूनच आ.हं.नी आपल्या मनाला समजावत आपलं जगणं हे फक्त आपल्यासाठी नाही हे लक्षात घेऊन समाजप्रतीची आपली कर्तव्यं पूर्ण करण्यासाठी मागे पडलेलं लिखाण हाती घेतलं. सहा वर्षांच्या अथक परिश्रमातून आणि अभ्यासातून 'सर्वोत्तम भूमिपुत्र : गौतम बुद्ध' सारखा अप्रतिम असा ग्रंथ निर्माण होऊ शकला. एकीकडे विचारप्रवर्तक गंभीर लिखाण करणारे आ.ह. तर दुसरीकडे अतिशय हवं मन सोबत घेऊन आपल्या कवितेतून व्यक्त होणारे आ. ह. दोन्हीही व्यक्ती एकच आहेत.

आ. ह. साळुंखे यांनी मानवतेप्रती हाती घेतलेलं कार्य स्पृहनीय आहे. त्यांच्यातल्या सच्चा कार्यकर्त्याला, अभ्यासू विचारवंताला आणि माणुसकी जपणाऱ्या या संवेदनशील मनाला कोटी कोटी प्रणाम!

- दीपा देशमुख
adipaa@gmail.com

# सोडू नको धीर

नको घेऊ गळफास नको गाठू विहिर

माझ्या कष्टकरी बापा असा सोडू नको धीर

तुझ्यामुळे देश माझा सुजलाम सुफलाम

साऱ्या जगात पवित्र तुझ्या निठळाचा घाम

घाम सोडलेलं रान जणू कष्टाचं मंदिर

मोडू नये अर्ध्यावर गोड संसाराचा डाव

वादळाच्या सोबतीने नेऊ पैलतीरी नाव

संकटाशी लढणारा तुच खरा शुरवीर

येता वाईट विचार पोराबाळाला बघावं

रात सरता दिवस येतो आशेनं जगावं

सारू डोंगर बाजूला पाय रोवून खंबीर तुझी एक ललकारी नाचे पाखरांचा थवा

वेरूळ अजिंठ्याची लेणी तुझ्या हाताचा तळवा

तूच लिहितो हरेक घरट्यांची तकदीर....

**कवी: योगिराज माने**
**लातूर**
**संपर्क:** ९४२२४७०७२०

## जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषदेचा कार्य अहवाल

# परभणी जिल्हा शाखेचा दसरा मेळावा संपन्न




दिनांक २५ ऑक्टोबर २०२० दिवशी सायंकाळी चार वाजता कोविडच्या नियमांचे पालन करत दसरा मेळावा घेण्यात आला. श्रीमान सुभाष ढगे यांच्या बहारदार सूत्र संचलनाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. जिजाऊ मंदिरासाठी ज्यांनी स्वतःची जमीन दिली ते सरकटे सर शिक्षण अधिकारी अध्यक्षस्थानी तर, प्रमुख पाहुण्या म्हणून राही कदम आणि कांचन कारेगांवकर उपस्थित होते. त्यावेळी लॅपटॉप पुजन आणि जिजाऊंच्या कार्यावर सखोल चिंतन झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष असलेल्या सरकटे सरांनी त्यांच्या भाषणात आपण समाजाचे देणे लागतो. तेव्हा आपण सामाजिक बांधिलकी जपायला हवी.

तरच अपेक्षित नवसमाज निर्मितीची आपल्याला आशा बाळगता येईल असे मनोगत व्यक्त केले.

राही कदम यांनी मनोगताची सुरुवात संत गोरोबा कुंभाराच्या अभंग गायनाने केली आणि राजमाता जिजाऊच्या विचारांची आजच्या समाजाला किती गरज आहे. सुराज्याच्या शिल्पकार जिजाऊ होत्या त्याचप्रमाणं तिनं ठरवलं तर, आपल्या मुलांवर संस्कार करून आजची जिजाऊ सुद्धा सुराज्य निर्माण करू शकते. आजच्या अत्याचाराच्या घटना नक्कीच धडकीच भरवणाऱ्या आहेत. संस्कृतीत विकृती निर्माण करणाऱ्या आहेत. आणि याला जबाबदार कोण? आईच्याच कुशीत जन्म घेऊन, आईवर हल्ला करतो याला जबाबदार कोण? याला कारणं वेगवेगळी आहेत. बेरोजगारी, व्यसनाधीनता तसेच भांडवली व्यवस्था सुद्धा आहे. काहीही जरी असलं तरी संस्कार देण्याचं काम आईच चोखपणे बजावू शकते, कितीही कठीण काळ असेल तरीही, परंतु तिने ठरवायला हवं. भले त्यालापेसा नाही कमावता आला तरी चालेल, नौकरी नाही लागली तरी चालेल, फक्त एक माणूस म्हणून जगण्याची तालीम फक्त एक आईच देवू शकते, अर्थात तिनं ठरवलं तरच असे मनोगत मांडले.

बाळासाहेब यादव सरांनी बहारदार आवाजात वामनदादा कर्डक यांची गीतं सादर केली. त्यावेळी शाळेतील लहान लहान मुलं सुद्धा खुप सुंदर बोलू लागली. शाम गाडेकर यांनी गावाच्या बाहेर सात किलोमीटर असणाऱ्या जिजाऊच्या मुर्तीला पुढील वर्षभरासाठी रोज हार घालण्याची जबाबदारी स्विकारून येणाऱ्या पिढीसमोर, एक नवीन आदर्श निर्माण केला.

---

## येथे

चोरट्यांना साथ येथे
सज्जनावर मात येथे

दुष्ट फिरती मोकळ्याने
चांगल्यांना लाथ येथे

पेरण्या समतेस का रे ?
आड येथे जात येथे

मागती मत लोक नेते,
मोठमोठी बात येथे.

आजही गर्भात लेकी
मारती का तात येथे?

सावकारी पाश मोठा
का बळीचा घात येथे?

**कवी : प्रमोद जाधव**
**जिल्हा सचिव,**
**ज.तु.साहित्य परिषद बीड**

# अक्क महादेवीचे वचनसाहित्य नव्या पिढीने अभ्यासावे

स्त्रियांना दिली जाणारी दुय्यम वागणूक, अंधश्रद्धा, प्रस्थापितांचा होत असलेला विरोध झुगारून जगातील पहिली लोकसभा समजल्या जणणाऱ्या अभिनव मंडपात अक्क महादेवींनी स्वतःचे एक विशेष स्थान निर्माण केले होते. त्यांनी तत्कालीन परिस्थितीशी निगडीत अनेक कुप्रथांवर प्रहार करणाऱ्या तब्बल ३५५ वचन साहित्याची निर्मिती केली. महादेवींच्या वचनांमध्ये कल्पकता आणि कोमलता या दोन्ही बाबी दिसून येतात. अक्क महादेवीची वचने ही समाजाला दिशा देणारी असून त्यांचे वचन साहित्य नव्या पिढीने अभ्यासावे, असे प्रतिपादन बसव साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक प्रा. रेवनसिद्ध शहाबादे यांनी केले.

मराठा सेवा संघ प्रणीत जगद्‌गुरू तुकोबाराय साहित्य परिषद महाराष्ट्र द्वारा नवरात्र महोत्सवाचे औचित्य साधून दि. १७ ते दि. २५ ऑक्टोबर या कालावधीत महाराष्ट्रातील नऊ जिल्ह्यांमध्ये इतिहासातील परिवर्तनवादी स्त्री साहित्यिकांच्या साहित्यांचा व त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा परिचय समाजाला व्हावा या उद्देशाने राज्याध्यक्षा डॉ. निर्मला पाटील यांच्या संकल्पनेतून साहित्य जागर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचाच भाग म्हणून जगद्‌गुरू तुकोबाराय साहित्य परिषद शाखा लातूरच्या वतीने वैभव नगर येथील श्री विद्यालयात परमज्योती अक्क महादेवी या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी ज्येष्ठ रंगकर्मी प्रा. रेवणसिद्ध शहाबादे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठा सेवा संघाचे राज्य उपाध्यक्ष लिंबराज सूर्यवंशी होते. या प्रसंगी मंचावर मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष प्रा. सुनील नावडे, जगद्‌गुरू तुकोबाराय साहित्य परिषदेचे जिल्हाध्यक्ष विवेक सौताडेकर, सहसचिव मनिषाताई गुंजरगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

जगतज्योति महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात अनुभव मंटपाची स्थापना करून समस्त विश्वाला समतेचा आणि एकात्मतेचा संदेश दिला. त्याच अनुभव मंटपातील एक विद्वान स्त्री साहित्यिक म्हणून अक्क महादेवीचा उल्लेख केला




जातो, असे सांगून प्रा. शहाबादे म्हणाले की, भारताचा विचार केला तर उत्तरेत संत मीराबाई आणि दक्षिणेत अक्कमहादेवी पुढे आधुनिक काळातील हिंदी साहित्यातील महादेवी वर्मा या तिन्ही स्त्रियांच्या विचारांमध्ये आणि कृतीमध्ये बरेचसे साम्य दिसून येते. या तिन्हींचा कालावधी जरी वेगळा असला तरी या तिन्ही स्त्रिया वैरागिनी आहेत हेच यातून निष्पन्न होते. बसव साहित्याचा एक महत्त्वपूर्ण भाग असणाऱ्या अक्कमहादेवी यांच्या साहित्यावर जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषदेने या व्याख्यानातून माध्यमातून प्रकाश टाकण्याचा स्तुत्य प्रयत्न केला असून अक्कमहादेवी यांच्या साहित्यावर विपुल प्रमाणात मराठीतून लेखन होण्याची आवश्यकता असल्याचे मतही त्यांनी यावेळी व्यक्त केले.

याप्रसंगी मराठा सेवा संघ महानगर शाखेचे अध्यक्ष पृथ्वीराज पवार, जिजाऊ ब्रिगेडच्या विभागीय अध्यक्षा वनीताताई काळे, जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षा ताई बोराडे, तानुबाई बिर्जे, पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब जाधव, मराठा सेवा संघाचे कार्याध्यक्ष संभाजी नवघरे, संगीतसूर्य केशवराव भोसले सांस्कृतिक परिषदेचे विभागीय अध्यक्ष प्रकाश लेणेकर या नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विवेक सौताडेकर यांनी केले.

सूत्रसंचालन संघटक बाळासाहेब यादव तर आभार परिषदेचे सचिव ब्रिजलाल कदम यांनी व्यक्त केले असून या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. दिलीप गुंजरगे, साहितय परिषदेचे कार्याध्यक्ष युवराज ढविले, उपाध्यक्ष प्रा. दत्ता माने, किशनराव बिरादार आदींनी प्रयत्न केले.

# महदंबेचे साहित्यिक व सामाजिक कार्य अत्यंत मोलाचे : डॉ. जाधव

खटाव : तेराव्या शतकातील आद्य मराठी कथाकाव्यकार महदंबेचे साहित्यिक व सामाजिक कार्य अत्यंत मोलाचे आहे. ज्या काळात स्त्रीला कसल्याच स्वातंत्र्याची मुभा नव्हती. अशा काळात नारी समस्येला वाणी देण्याचं काम महदंबेने आपल्या धबळ्यांच्या माध्यमातून केले आहे. मराठीतील पहिली कथाकाव्यकर्ती म्हणून महदंबेचा आवर्जून उल्लेख केला जातो असे उद्गार जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषद महाराष्ट्रच्या सातारा शाखेचे व जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. उदय जाधव यांनी महदंबेचे जीवन कार्य व सामाजिक योगदान या विषयावर आपले मत व्यक्त करताना काढले.

मराठा सेवा संघ प्रणित जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषदेच्या वतीने खास नवरात्रमध्ये नवरात्र उपक्रम म्हणून जागर साहित्याचा, नवदुर्गांच्या विचारांचा, कर्तृत्ववान स्त्रियांचाही उद्धोषणा घेऊन वेगवेगळ्या जिल्ह्यामधून वेगवेगळ्या कर्तृत्ववान स्त्रियांच्या विचारांचा कोरोना पार्श्वभूमीवर ऑनलाईन जागर करण्यात आला. याच प्रक्रियेचा भाग म्हणून सातारा शाखेच्या वतीने बाराव्या शतकातील महदंबा या महानुभाव संप्रदायातील आद्य कथाकाव्यकर्तीची निवड केली होती. महदंबेचे धबळे एक संगीतमय दर्शन या विषयावर प्रथमच धबळ्यांचे गायन केले गेले. जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषद, महाराष्ट्रचे संस्थापक अध्यक्ष ॲड. पुरुषोत्तम खेडेकर, प्रदेशाध्यक्षा डॉ. निर्मलाताई पाटील, प्रदेश महासचिव बालाजी जाधव, उपाध्यक्षा सुनंदाताई जरांडे आदी पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

धबळे म्हणजेच लग्न समारंभारत नवऱ्यासाठी गायलेली गीते. हे धबळे संगीतबद्ध सादरीकरणाचे कार्य संजय पवार यांच्या टीमने उत्कृष्टरित्या केले. या प्रसंगी निवेदनाचे काम प्रा. डॉ. कोमलताई कुंदप व प्रा. डॉ. तेजस्विनी पाटील यांनी केले. यावेळी सातारा जिल्ह्यातील नवनियुक्त कार्यकारिणीचा परिचय व स्वागत देखील करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात जिजाऊ वंदनेने करण्यात आली. आभार डॉ. प्रतिभा पाटणे यांनी मानले.

# जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषदेच्या वतीने वृक्षारोपन कार्यक्रम संपन्न



भोगाव देवीचे ता. जिंतूर, जि. परभणी येथे देवीची एकूण सत्तर एकर डोंगरमाथ्यावर तांबड्या रंगाची जमीन आहे. तिथं वृक्ष प्रेमी आण्णा जगताप आणि सिने कलावंत सयाजी शिंदे यांनी देवीच्या दरबारात वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे या तुकोबारायांच्या अभंगाला सार्थ ठरवत फळझाडांची लागवड करण्याचा एक मोठा प्रकल्प हाती घेतला आहे.

त्याच नवोपक्रमाच्या माध्यमातून जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषद, परभणी आणि सावित्री मंच परभणी यांच्या वतीनं 'प्रत्येकानं नऊ झाडे' या प्रमाणं एकूण ५०० झाडांची लागवड केली. तेव्हा प्रत्येकी एक झाड देऊन आमचा सन्मानही करण्यात आला.

विविध झाडाविषयी माहिती देताना आण्णा जगताप म्हणाले, "आपण आज झाडं लावली तर आपल्या गेल्यानंतर हीच झाडं किती पिढ्यांना आधार देतील, आपल्या स्मृती जपतील. येणाऱ्या पिढीला प्रदूषणमुक्त जगवायचे असेल तर आज आपण सावध असायला हवं. सावध ऐका पुढल्या हाका या प्रमाणेच आपण प्रत्येक वाढविसाला एक झाड लावायला हवं. सर्वांना चहा, नास्ता आणि जेवणाची उत्तम व्यवस्था त्यांनी केली होती.